गुरुवार, 14 जुलै 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 308
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • THURSDAY 14 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-308 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

## पुणे, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांना रेड अलर्ट तर अनेक ठिकाणी सतर्कतेचा आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यात आजही अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडल्याचे चित्र आहे. येत्या दोन दिवसामध्ये पावसाचा हा जोर कायम राहण्याची शक्यता असून अनेक ठिकाणच्या शाळा बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा या ठिकाणी हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला आहे. तर अनेक ठिकाणी नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.**

पुढील 48 तासात पुणे जिल्ह्यात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जिल्ह्यातील घाट परिसरात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुसळधार पावसामुळे पुण्यातील शाळा बंद राहणार आहेत. पावसामुळे शहराच्या सखल भागात पाणी साचते. त्यामुळे आज दुपारपासून उद्या सायंकाळपर्यंत शाळा भरणार नाहीत. प्रशासनाने हा निर्णय घेतला. हवामान विभागाकडून पुणे जिल्ह्याला रेड अलर्ट देखील देण्यात आला आहे. कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यात पुढील 48 तासात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. मुंबईत देखील मोठ्या प्रमाणात पाऊस होण्याची शक्यता आहे. कोल्हापूर आणि सांगलीमध्ये मुसळधार पाऊस सुरूच असून पंचगंगा आणि कृष्णा नदीच्या पातळीत वाढ झाली आहे. साताऱ्यामध्ये कोयनेच्या क्षेत्रामध्ये जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अतिमुसळधार पाऊस पडलेल्या ठिकाणी शाळा बंद ठेवण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

रायगडमध्येही शाळा बंद ठेवण्याचा निर्णय

गेल्या दोन दिवसांपासून रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे दोन दिवस शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्याठिकाणी मुसळधार पाऊस असेल, तिथे शाळा बंद ठेवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.


लातूर जिल्ह्यात काल आणि आज दिवसभर संततधार होती. नद्या, नाल्यांना पाणी आले आहे. मांजरा नदीवरील वांगदरी, होसूर बॅरेजेस शंभर टक्के भरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पाणी नदीपात्रात सोडले जाणार असून नदीकाठच्या गावांना पाटबंधारे विभागाने सावधानतेचा इशारा दिला आहे. जिल्ह्यात चार-पाच दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. जिल्ह्यात मोठे, मध्यम व लघू असे 148 प्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पांचा एकूण पाणीसाठा 332.415 दलघमी, मृतपाणीसाठा 135.732 दलघमी उपयुक्त पाणीसाठा 196.693 दलघमी आहे. उपयुक्त साठ्याची टक्केवारी 26.14 आहे. यातील काही प्रकल्पांतच हळूहळू जलसाठा वाढतोय. मांजरा प्रकल्प क्षेत्रावर 151.5 मी.मी. पाऊस झाला आहे. या पावसावरच मांजरा प्रकल्पात एक टक्क्याने पाण्याची वाढ झाली असल्याची माहिती आहे.

गेल्या चार दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नांदेड जिल्ह्यात बुधवारी सकाळी 8.20 वाजता संपलेल्या पावसानंतर, गेल्या 24 तासात सरासरी 118 मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण 510.30 मिलीमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. त्यामुळे पूरपरिस्थिती पाहता जिल्ह्यातील शाळांना सुट्टी देण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील गोदावरी, आसना, मन्याड, पैनगंगा, मांजरा या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तर नांदेड शहराची तहान भागवणारा डॉ. शंकरराव चव्हाण विष्णूपुरी प्रकल्प 84.21 टक्के क्षमतेने भरला आहे. दरम्यान नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, हदगाव, उमरी, मुदखेड, मुखेड, बिलोली, नांदेड तालुक्यात मुसळधार पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. तर सखल भागात राहत असलेल्या नागरिकांच्या घरात पाणी घुसले आहे.

### जायकवाडीत 95 हजार क्युसेकने आवक सुरु

नाशिक जिल्ह्यातील धरणातून सुरु असलेला विसर्ग आणि धरण परिसरात होत असलेल्या पावसामुळे जायकवाडी धरणात 95 हजार 556 क्युसेक पाण्याची आवक सुरु आहे. तर जायकवाडी धरण तब्बल 46 टक्के भरले आहे. त्यामुळे धरणातील जिवंत पाणीसाठा 1014.421 दलघमी आहे. तर फुटामध्ये पाणीपातळी 1510.65 फुट असून, मीटरमध्ये 460.446 मीटर आहे. तर धरण क्षेत्रात सुरु असेलला पाऊस अजूनही सुरुच आहे. या परिसरातील पूरपरिस्थितीवर प्रशासन लक्ष ठेऊन आहे.



# राम सेतूला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याची मागणी

## 26 जुलै रोजी सुप्रीम कोर्टात सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राम सेतूला राष्ट्रीय स्मारक घोषित करून त्याचे संरक्षण करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर लवकर सुनावणी करण्यास सुप्रीम कोर्टाने तयारी दर्शवली आहे. सुप्रीम कोर्टात या प्रकरणावर 26 जुलै रोजी सुनावणी होणार आहे. भाजप नेते खासदार सुब्रह्मण्यम स्वामी यांनी ही याचिका दाखल केली आहे. काँग्रेसच्या नेतृत्वातील युपीए सरकारच्या कार्यकाळात सेतू समुद्रम प्रकल्प योजना सुरू करण्यात आली. मालवाहू जहाजांच्या वाहतुकीसाठी मार्ग तयार करण्यासाठी राम सेतू तोडण्यात येणार होते. मात्र, कोर्टाने दिलेल्या आदेशानंतर ही कारवाई थांबवण्यात आली. तेव्हापासून राम सेतूला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवरील सुनावणी प्रलंबित आहे.

वर्ष 2014 मध्ये एनडीए आघाडीचे सरकार आले. त्यावेळी केंद्र सरकारने देशहितासाठी राम सेतूचे कोणतेही नुकसान होऊ देणार नसल्याचे सुप्रीम कोर्टात म्हटले. केंद्र सरकारकडून सेतू समुद्रम प्रकल्पासाठी पर्याय शोधत आहे. मात्र, केंद्र सरकारने राम सेतूला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देऊन त्याचे भविष्यात संरक्षण करण्याबाबत सरकारने कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही.


वर्ष 2017 पासून सुब्रह्मण्यम स्वामी यांनी आपल्या याचिकेवर सुनावणी करण्याबाबत कोर्टाला अनेकदा विनंती केली आहे. सुप्रीम कोर्टाने 13 नोव्हेंबर 2019 रोजी केंद्र सरकारला आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी सहा आठवड्यांचा वेळ दिला होता. मागील वर्षी एप्रिल महिन्यात तत्कालीन सरन्यायाधीश एस.ए. बोबडे यांनी म्हटले होते की, त्यांचा कार्यकाळ पूर्ण होणार आहे. त्यामुळे आगामी सरन्यायाधीश एन. व्ही. रमण्णा यांच्या समोर ही याचिका योग्य निर्देशासाठी आणण्यात यावी.

खासदार सुब्रह्मण्यम स्वामी यांनी आज या प्रकरणी सरन्यायाधीश रमण्णा, न्या. कृष्ण मुरारी आणि हिमा कोहली यांच्या खंडपीठासमोर आपली बाजू मांडत याचिकेवर लवकरात लवकर सुनावणी करण्याची विनंती केली. त्यानंतर खंडपीठाने स्वामी यांची याचिका आणि इतर मुद्यांशी निगडीत असलेल्या याचिकेवर 26 जुलै रोजी सुनावणी करणार असल्याचे सांगितले.

# आर्यनला दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आर्यन खानला मुंबई सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. जामीन देताना एनसीबीकडे जमा केलेला पासपोर्ट परत देण्याचे निर्देश आज देण्यात आले आहेत. कॉर्डिलिया क्रुझ ड्रग्ज प्रकरणात एनसीबीने शाहरूख खानचा मुलगा आर्यनला अटक केली होती. मात्र, एसआयटीने दाखल केलेल्या आरोपपत्रात नाव वगळल्याने आर्यनला क्लीन चीट मिळाली आहे. ड्रग्स केसप्रकरणी अभिनेता शाहरूख खान याचा मुलगा आर्यन खान याला क्लीन चिट देण्यात आली आहे. एनसीबीने आपल्या चार्जशीटमध्ये लिहिले आहे की, आर्यन खान विरोधात कोणतेही पुरावे नाहीत. म्हणजे एनसीबीला आर्यन खानने ड्रग्स घेतल्याचे किंवा त्याच्याकडे ड्रग्स असल्याचे पुरावे सापडले नाहीत.



# भाजपा आमदार जयकुमार गोरे यांना सर्वोच्च न्यायालयाचा झटका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भाजपा आमदार जयकुमार गोरे यांना सर्वोच्च न्यायालयाने देखील झटका दिला आहे. जयकुमार गोरे यांनी अटकपूर्व जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, न्यायालयाने गोरे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यांच्यावर जमिनीची खोटी कागदपत्रे बनवून घोटाळा केल्याचा आरोप आहे. याच प्रकरणात आमदार गोरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

सर्वोच्च न्यायालयाने आमदार जयकुमार गोरे यांना आधी कोर्टापुढे शरण येण्याचे आणि मग जामिनासाठी अर्ज करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे गोरे यांना आता वडूजच्या न्यायालयासमोर हजर राहून मगच जामिनासाठी अर्ज करता येणार आहे.

आमदार जयकुमार गोरे यांच्यासह एकूण सहा जणांवर मायणी गावातील जमिनीबाबत खोटी कागदपत्रे तयार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी महादेव पिराजी भिसे यांच्या तक्रारीवरून आरोपींविरोधात दहिवड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. विशेष म्हणजे जमिनीची खोटी कागदपत्रे बनवण्यात तलाठी देखील आरोपी आहे.



आरोपी तलाठी सध्या फरार आहे. या प्रकरणात आतापर्यंत आरोपी संजय काटकरला अटक झाली आहे. त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीय. या पार्श्वभूमीवर आमदार जयकुमार गोरे यांनी वडूज न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.

# १८ वर्षांवरील सगळ्यांना बूस्टर डोस मोफत

## मोदी सरकारची सर्वात मोठी घोषणा; १५ जुलैपासून लागू होणार

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : देशात गेल्या काही आठवड्यांपासून करोनाचे रुग्ण वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. करोना प्रतिबंधात्मक लसीचा बूस्टर डोस सगळ्यांसाठी मोफत करण्यात आला आहे. १८ वर्षांवरील वयाच्या सगळ्यांना बूस्टर डोस मोफत दिला जाईल.


सध्याच्या घडीला देशात दररोज करोनाचे १५ हजारांहून अधिक रुग्ण आढळून येत आहेत. बहुतांश नागरिकांचे दोन डोस पूर्ण झालेले आहेत. मात्र अनेकांनी बूस्टर डोसकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे सरकारने १८ वर्षांवरील सर्वांना बूस्टर डोस मोफत देण्याची घोषणा केली आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी ही माहिती दिली. त्यासाठी १५ जुलैपासून पुढील ७५ दिवस बूस्टर डोसची मोहीम राबवण्यात येईल. आतापर्यंत देशात लसीचे १९९ कोटी डोस देण्यात आले आहेत.


करोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन्ही डोस मोफत असल्याने बहुतांश नागरिकांनी ते वेळेवर घेतले. मात्र बूस्टर डोस आतापर्यंत मोफत नव्हता. त्यामुळे अनेकांनी त्याकडे पाठ फिरवली. आता लोकांमध्ये जागरुकता वाढावी आणि त्यांनी बूस्टर डोस घेण्यासाठी स्वत:हून पुढे यावे यासाठी सरकारने ७५ दिवस बूस्टर डोस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे.

सध्या भारतात आरोग्य कर्मचारी, फ्रंटलाइन वर्कर्स आणि 60 पेक्षा जास्त वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत बुस्टर डोस दिला जात आहे. यांना सरकारी लसीकरण केंद्रावर हे डोस उपलब्ध आहेत. तर 18-59 वयोगटातील नागरिकांसाठी खासगी लसीकरण केंद्रावर बुस्टर डोस दिले जात आहेत. ज्यासाठी त्यांना पैसे मोजावे लागत आहेत. पण आता या वयोगटातील नागरिकांनाही बुस्टर डोससाठी पैसे मोजण्याची गरज नाही. 15 जुलैपासून 18+ सर्वांना मोफत बुस्टर डोस मिळेल.

तज्ज्ञांच्या मते, कोरोना लशीच्या दुसऱ्या डोसनंतर शरीरात तयार झालेली इम्युनिटी काही महिन्यांनंतर कमी होते. त्यामुळे ही इम्युनिटी पुन्हा तयार करण्यासाठी तिसऱ्या डोसची गरज असते. कित्येक देशांमध्ये हा डोस बूस्टर डोस म्हणून दिला जातो. भारतात याला 'बूस्टर डोस' न म्हणता 'प्रिकॉशन डोस', म्हणजेच खबरदारीचा डोस म्हटले जात आहे.

काही दिवसांपूर्वीच सरकारने बूस्टर डोस घेण्याचा कालावधीदेखील कमी केला. आधी दोन डोस घेतल्यानंतर ९ महिन्यांनंतर बूस्टर डोस घेण्याची परवानगी होता. मात्र आता हा अवधी ६ महिन्यांवर आणण्यात आला आहे. देशात आतापर्यंत १८ ते ५९ वयोगटातील ७७ कोटी लोकांनी बूस्टर डोस घेतला आहे. हा आकडा वाढवण्यासाठी सरकारने विशेष अभियान हाती घेतले आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## अवलियांचा गाव : राहाता

आधुनिक केसरी

प्रसंगी लोकांना कमी पैशात पुस्तके देऊन स्वतः झळ सोसली पण लोक पुस्तक घेऊन वाचताहेत याचा विलक्षण आनंद त्यांना होता. मामांच्या वागण्याबोलण्यात प्रेम, आपुलकीचे दर्शन घडले. रवींद्र म्हणाले की मामा ही एक चालतीबोलती शाळा आहे. त्यांच्याजवळ केव्हाही येऊन बसावे आणि ज्ञानाने समृद्ध व्हावे. अशी माणसं म्हणजे समृद्धीचे महावृक्ष असतात. त्यांच्या छायेत बसावं, त्यांच्या पायाशी बसावं आणि पावन व्हावं. डी यु मामांना भेटल्यावर एका ऋषितुल्य व्यक्तिमत्वाला भेटल्याचा आनंद मला झाला.

रात्री जेवण झाल्यावर रवींद्र यांच्यासोबत गावात फेरफटका मारला. रवीन्द्र आणि त्यांच्या साई योग फाउंडेशनने लावलेली झाडं त्यांनी आम्हाला दाखवली. ही झाडं त्यांनी मुलांप्रमाणे जपली आहेत, वाढवली आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसहा वाजता आम्ही कार्यक्रम स्थळी हजर झालो. सगळ्या उत्साही कार्यकर्त्यांनी आधीच खुर्च्या, ध्वनिक्षेपक यंत्रणा इ व्यवस्था केली होती. पावसाचे हलके तुषार अंगावर झेलत आम्ही आधी वृक्षारोपण केले. नंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी त्या गावाचे तहसीलदार श्री हिरे साहेब, गट विकास अधिकारी श्री शेवाळे साहेब, डॉ पानगव्हाणे आणि त्यांचे कुटुंबीय, संजय सदाफळ, लायन्स क्लबचे सदस्य आणि गावातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. डी यु मामांना त्यांच्या घरून आणण्यासाठी आणि नेण्यासाठी खास व्यवस्था केली होती.

दरवर्षी सात जुलैला ही सगळी मंडळी वृक्षांचा वाढदिवस साजरा करतात. या प्रसंगी ' आज माझा वाढदिवस ' असे वृक्षांचे मनोगत व्यक्त करणारा फलक लावला होता. वाढदिवसाच्या दिवशी आपण केक कापतो. मग वृक्षांच्या वाढदिवशी तो का नको या भावनेतून एक सुंदर, देखणा आणि वृक्षाची प्रतिकृती असलेला केक तयार करण्यात आला होता. या प्रसंगी पर्यावरणासाठी झटणाऱ्या व्यक्तींचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. व्यासपीठावर बसलेल्या मान्यवरांचा जसा गौरव करण्यात आला तसाच गौरव अगदी सामान्य कार्यकर्त्यांचा देखील केला गेला. यातून त्या प्रत्येक व्यक्तीला वाटत होतं की हा कार्यक्रम माझा आहे, माझ्यासाठी आहे. या प्रसंगी मला सामाजिक समरसतेचं अनोखं रूप पाहायला मिळालं. लोकांचा उत्साह पाहून या कार्यक्रमात तहसीलदार आदी उच्चपदस्थ व्यक्ती देखील आनंदाने सहभागी झाल्या होत्या. कुठलाही ध्यास घ्यायचा तर वेडं व्हावं लागतं. अशी पर्यावरण प्रेमाचं वेड घेतलेली सगळी अवलिया मंडळी मला इथे बघायला मिळाली.

या प्रसंगी बोलताना मी म्हणालो, **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## शिक्षणामुळे समाजाची विचारसरणी सुधारते

आधुनिक केसरी

शिक्षण माणसाला ज्ञान मिळवण्यास आणि जीवनात आत्मविश्वास वाढविण्यास मदत करते. हे आपल्याला करिअरमध्ये, वैयक्तिक सुधारणा करण्यास आणि व्यक्तिमत्व वाढीस मदत करू शकते. सुशिक्षित व्यक्तीच समाजाचा उत्तम नागरिक बनू शकते. हे आपल्याला जीवनात योग्य निर्णय घेण्यास मदत करते. कोणत्याही प्रकारचे शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास निश्चितच उपयुक्त ठरते. शिक्षणामुळे व्यक्तीचे ज्ञान, कौशल्ये सुधारतात, व्यक्तिमत्व आणि वृत्ती विकसित होते. सर्वात लक्षणीय बाब म्हणजे, शिक्षणामुळे रोजगाराच्या संधींवर सकारात्मक परिणाम होतो. उच्च शिक्षित व्यक्तीला चांगली नोकरी मिळण्याची शक्यता असते. शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे जी प्रत्येकाला निवीन काही ना काही शिकण्यास, ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करण्यास मदत करते. शिक्षणामुळे समाजाची विचारसरणी सुधारते आणि सामाजिक दुष्कृत्यांचे समूळ उच्चाटन होण्यास मदत होते. अर्थातच, हे समाजातील असमानतेशी लढा देऊन देशाच्या समान विकासास मदत करते. खरे तर, शिक्षण ही यशाची गुरुकिल्ली आहे. शिक्षण आपल्याला शिकण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व ज्ञानाची जाणीव करून देते आणि ते आपल्याला प्रगती करण्यास मदत करते. शिक्षण हे एक असे आवश्यक साधन आहे, जे एखाद्याचे जीवन सुधारण्यासाठी ज्ञान, विश्वास, बळ आणि आनंद देते. शिक्षण प्रक्रियेत शिक्षणाच्या गुणवत्तेनुसार विविध पायऱ्यांचा समावेश होतो. ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, जी समाजाची नैतिकता आणि संस्कृती घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. नवकल्पना, उत्पादकता आणि मानवी भांडवल वाढवून शिक्षणामुळे आर्थिक वाढ होऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### 'विश्राम'ही आज । शांत झाला ।।

ऐसा कैसा खेळ । खेळशी विठ्ठला ।।
कोडे या जीवाला । आकळेना ।।

सुखाच्या लहरी । विरूनिया जाती ।।
दुःख का संगती । सोडियेना ? ।। २ ।।

देह निरंजनी । तेवी आत्मज्योत ।।
तरी पंचत्वात । विलीन होई ।।३ ।।

पंचमहाभूते । वाटेकरी झाले ।।
दुःख टांगलेले । भिंतीवरी ।।४ ।।

हंबरडा फोडी । माय दीनवाणी ।।
काय खेळपाणी । खेळतोसी ? ।। ५ ।।

व्याकूळला जीव । ऐसा कैसा राज ।।
'विश्राम'ही आज । शांत झाला ।। ६ ।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"


आधुनिक केसरी

**अप्रियवचनदरिद्रैः**
**प्रियवचनाढ्यैः स्वदारपरितुष्टैः ।**
**परपरिवादनिवृत्तैः**
**क्वचित्क्वचिन्मण्डिता वसुधा ।।**

**अर्थ :** कठोर वचनांनी रहित, प्रिय वचनांनी युक्त, परस्त्रीची कामना न करणारा, परनिंदेपासून निवृत्त अशा दुर्लभ माणसांनी ही वसुधा क्वचित् क्वचितच अलंकृत होते. गुणी माणसे कशी दुर्लभ असतात, या विषयी भर्तृहरींनी येथे सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर



## ।। दासबोध स्तवन ।।

### मायाब्रह्मनिरूपण

आधुनिक केसरी

माया मात्र तर्काच्या कक्षेत असल्याने तिच्यामध्ये पूर्व पक्ष व ऊत्तरपक्ष अशा वादाच्या दोन्ही बाजू आहेत. 15 )ब्रम्ह एकमेव सिध्दांत तर माया अनेक पूर्वपक्ष आहे. ब्रम्ह शाश्वत आहे तर माया अशाश्वत आहे ब्रम्ह कर्मरहित व हेतु रहित तर माया कर्ममर व हेतुयुक्त आहे. आपण वरील अभ्यासात समर्थानी माया व ब्रम्ह यांचा संबंध कसा आहे, त्याची लक्षणे कोणती ,माया म्हणजे काय? मा या धातूपासून"माया"शब्द बनतो. मा म्हणजे मोजणे,मापणे,मावणे,समावेश होणे. माया म्हणजे जिच्यामध्ये विश्व मावते. विश्वमातियस्याम जी परब्रम्हाला मोजमापात आणते ती शक्ति म्हणजे "माया" होय. ब्रुहदारण्यट उपनिषदामध्ये याज्ञवल्क्यानें मैत्रियीस सांगितले आहे की "इदं सर्व यदयामात्मा" जे काही आहे ते सर्व आत्मस्वरूप आहे. अद्वैत दर्शनकारांचे म्हणजेच आपल्या समर्थाचे पण हेच म्हणणे आहे. की या अखिल विश्वाचे मुळ तत्व एकच एक आत्मा आहे. त्याच्या ठिकाणी अनेकपणा नाही. येथे यत्किंचितही अनेक पणा नाही. मग प्रश्न असा निर्माण होतो की "अनेक पणाने भरलेले जग कसे निर्माण झाले? याचे ऊत्तर असे की"आत्म्यावांचून इतर वस्तुच नाही. (क्रमशः)



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## रंग वारीचे...

आधुनिक केसरी

सुहास आणि सुधीर हे दोघं भाऊ दोघे ही उच्च विद्याविभूषित. दोघेपण मोठे अधिकारी म्हणून कार्यरत. त्यांचे वडील सुरेशराव धार्मिक, देवभोळे, सरळ साधा माणूस. आपण भलं आपलं काम भलं, कुटुंब, घर, समाज, रितीरिवाज परंपरा ह्यात स्वारस्य असणारे. मुलांना चांगल्या पद्धतीने संस्कारित, उच्च विद्याविभूषित करून आपल्या पायावर उभे केले.

एकदा आपल्या मित्राच्या सांगण्यावरून वारीला जायचा निर्णय घेतला आणि तो व्यवस्थित पार पाडला. वारी करून आल्यावर त्यांनी स्वतः घेतलेले अनुभव सांगितले. इथुन पुढे आपण दरवर्षी वारी करणार हे सांगितले. तो त्यांनी शेवटपर्यंत पाळला. हे अनुभव सांगितल्यावर मोठ्या मुलाला पण वाटू लागले की आपण वारीला जावे आणि तो माऊलीच्या प्रेमातच पडला त्याची पण नित्यनेमाने वारी सुरू झाली.

ह्या वर्षी सुधीरच्या मनाने उचल खाल्ली. एक तरी टप्पा आपण पूर्ण करू पुढचे पुढे काय होईल ते पाहून ठरवुया. तयारीला लागला. माऊलींच्या प्रस्थानाचा दिवस आला. आपल्या मित्रांसोबत मुंबईहून आळंदीत पोहचले. सगळीकडे माऊलीमय वातावरण! भारावून टाकणारा, टाळ, मृदंग, वीणा, हरिनामाचा गजर ! ज्याच्या-त्याच्या मुखी विठ्ठलाचे नाम. टेक्नॉलॉजी कितीही पुढे गेलीतरी हरिनामाच्या गजराने कळस हलतो हे मान्य करायला हवेच ! तरुणाईला भुरळ पाडणारा नामघोष, उत्साह याने भारवलेल्या वातावरणात सुधीर हरखून गेला. माऊलींची पालखी आजोळघरी मुक्कामाला जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी पालखी निघते पुण्याला.

पुण्यात आल्यावर थकवा, शीण आला तरी अनपेक्षित असणारा उत्साह कायम होता. सुधीर आणि मित्र पुढचा टप्पा करावा असे ठरवतात. जो तो माऊली ! पालखीत बसणारी माऊली ! पालखी सोबत चालणारा माऊली ! अश्व देखील माऊली, बाई माऊली! पुरूष माऊली! तरूण माऊली ! म्हातारा माऊली ! कोणीच मोठ्यांनाही ना कुणी लहान नाही सोबतीने चालणारा प्रत्येक जण माऊली. ! प्रत्येकाची धारणा माऊली कोणत्याही रूपात आपल्याला भेटणारच. न जाणो माऊली भेटली आणि आपण ओळखलेच नाही तर. आपल्यासारखे आपणच करंटे ठरू. म्हणून सगळेच माऊली !




सासवडच्या टप्प्यात मोठा घाट तो पार करायचा त्यादिवशी एकादशी असते. हा अवघड टप्पा पार पडताना सुधीर आणि मित्र बसत उठत चालत होते. एके ठिकाणी बसल्यावर एक उंच, तेजस्वी, मध्यमवयीन गृहस्थ त्यांनी आपल्या डाव्या खांद्यावर घोंगडी घेतली होती. कुतुहलापोटी सुधीरने त्यांना हाक मारली. आत्तापर्यंत त्यांना कळले होतं की माऊली म्हणून ज्याला त्याला बोलायचे.

ते गृहस्थ जवळ येत म्हणाले का ओ माऊली ! दमलात का? सुधीरने मानेनेच होकार दिला. सुधीरच्या शेजारी येऊन बसले. पाय द्या हिकडं! म्हणजे फिरून बसा! त्यात बोलण्यात एक जरब होती ती सुधीरला जाणवली आणि काही न बोलता तो फिरला त्या गृहस्थाने आपल्या मांडीवर पाय ठेवून घेतले आणि पाय दाबायला सुरुवात केली. सुधीर ओशाळलला. त्याने त्या गृहस्थाने थांबायला सांगितले तर ते म्हणाले असू द्या माऊली ! न जाणो तुम्ही माऊली म्हणून आलात मी तुमची सेवा केली नाही असं व्हायला नको. एवढ्या वरच ते थांबले नाहीत तर त्यांनी सुधीरला नमस्कार केला आणि पुढे चालत गेले.

का, कसं, कुणास ठाऊक पण दमलेल्या पावलांचा शिणवटा कुठल्या कुठे पळून गेला. सुधीर भानावर आला आणि त्याच्या लक्षात आले की आपण त्याला नमस्कार केला नाही म्हणून तो त्या गृहस्थाला शोधू लागला. आपल्या डोळ्यांसमोर ती माऊली पुढे चालत होती. त्यानं हाका मारल्या माऊली! माऊली! पण ते गृहस्थ चालतच होते. सुधीरला वाटलं घाटातील वाऱ्यामुळे त्यांना ऐकू येत नसावं. ते दोघे भराभर पुढे त्यांना हाक मारत चालत होते. पण ते गृहस्थ न ऐकताच चालत होते. सुधीरला एकाने विचारले माऊली कुणाला हाका मारतायं समोर तर कुणी बी न्हाई ! सुधीर त्यांना म्हणाला अहो हे काय समोर तर आहेत ते उंच घोंगडी घेतलेले, त्यांचं घोंगडी तर खूप चमकतयं !

माऊली असं कुणी पण न्हाई तुमच्या फुडं ! आम्हाला तुमी दोघंच दिसतायं. दोघेही निशब्द झाले. माऊली ! माऊली!

( कथा स्वरुपात मांडली तरी ती घडलेली आहे.... सुधीर महाबळांच्या बाबतीत.....)

स्वतःशीच संवाद साधायचा असेल तर मनन चिंतन करावे जेव्हा वाटेल तेव्हा माऊली तुम्हा आम्हाला नक्की भेटेलच.... ती भेटण्यासाठी एक तरी वारी अनुभवावी.

।। रामकृष्ण हरि ।।

**-सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर**

# हिरा आणि गारगोटी दिसायला सारखीच असते फरक हा मूल्यमापनात असतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या संपर्कात येणारा प्रत्येक व्यक्ती हा दिसायला सारखाच असतो. आपण त्याच मुल्यमापन कसं करतो त्यावर आपली प्रगती अधोगती, किर्ती, अपकिर्ती, हित, लाभ, दुःख, आनंद, वेदना, त्रास अशा अनेक प्रकारचे फायदे-तोटे अवलंबून असतात. म्हणून मुल्यमापन चुकता कामा नये. दिसत तसं नसतं हा नैसर्गिक सिद्धांत आहे. आपण कशाला काय समाजावे हे सर्वस्वी आपल्या स्वतःवर अवलंबून असते. या संदर्भात कोणीही आपल्यावर कोणताही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव निर्माण करू शकत नाही. आपण आपल्या विवेकानुसारच मित्र-शत्रु तात्कालीन परिस्थितीमध्ये निश्चित करतो. तदनंतर काही कालावधीनंतर मात्र यामध्ये बदल होऊन मित्राचा शत्रु व शत्रुचा मित्र होऊ शकतो. मग असं काय घडलं की हा बदल झाला. तर काहीच घडलं नाही.**

आपण सुरवातीलाच मुल्यमापन करण्यात चुकलो होतो. गारगोटी ही गारगोटीच असते ती फक्त दिसण्यापुरती हिरा दिसु शकते. यामध्ये शंका नाही. परंतु गारगोटीला तिजोरीत ठेवले अगदी कुठेही ठेवले तरी ही गारगोटी हिरा होऊ शकत नाही. आपलच मुल्यमापन चुकत म्हणून आपण गारगोटीला हिरा समजतो. जसं हिरा आणि गारगोटी ही दिसायला सारखीच असते. परंतु फरक असतो मुल्यमापनाचा. तसंच आपल्या जीवनात येणाऱ्या दैनंदिन जीवनातील वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने अनेक लोक आपल्या संपर्कात येत असतात. त्यातील काही लोक अगदी आपल्यामध्ये असणारे कलागुण वापरून तसेच वेगवेगळे प्रकार करून आपल्या खुप जवळ येतात. परंतु ते आपल्यासाठी हितकारक निघतील किंवा आपल्यासाठी लाभदायक असतीलच असं नाही. किंबहुना नसतातच त्यापैकी काही आपलं हित करतात, तर काही आपलं प्रचंड नुकसान करतात म्हणून आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती हा कशा पदधतीचा आहे हे मुल्यमापन आपल्यला सुरवातीला समजणं खुप महत्वपूर्ण आहे. आपण आपल्या संपर्कात आलेल्या व्यक्तीच मुल्यमापन करण्यात जर चुकलो तर मग मात्र आपलं आतोनात नुकसान होऊ शकत.

वास्तविक हिरा आणि गारगोटी ही दिसायला सारखीच असते. पण फरक हा असतो तो हा मुल्यमापनाचा आणि चुकलं की आयुष्य बरबाद होत. म्हणूनच मुल्यमापन हे खुप महत्वाचे आहे. ज्याला मुल्यमापन कळलं त्याला जीवन समजलं आणि ज्याचं मुल्यमापन चुकलं त्याच आयुष्य बिघडलं. एकंदरीत घडण आणि बिघडण हे मुल्यमापनावर अंवलबुन असत. म्हणून वेळ, काळ परस्थिती ही कोणतीही असु द्या, कशीही असु द्या. गारगोटी आणि हिरा दिसायला सारखाच असल्याने नजर धोका खाते. पण मुल्यमापन धोका खाऊ शकत नाही. म्हणून योग्य मुल्यमापन करायला शिकलं पाहिजे. आपल्याला जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी माणसं आपल्या संपर्कात वेगवेगळ्या कारणांमुळे येऊ शकतात त्यातील काही माणसांमुळे भविष्यात आपल्याला मनस्ताप सहन करावा लागतो किंवा आपलं कधीच भरून निघणार नाही असं नुकसान पण होऊ शकत. याचा अर्थ आपल्या संपर्कात येणारे सगळेच आपल्याला अहितकारक असतील असं नाही. काही हितकारक सुद्धा असतील. म्हणून आपल्याला योग्य मुल्यमापन करता आलं पाहिजे आणि योग्य मुल्यमापन करता आलं तर आपल्याला गारगोटी आणि हिरा हा फरक लक्षात येऊ शकतो. आणि आपल्या जीवनातील होणाऱ्या नुकसानापासून आपण आपल्याला योग्य प्रकारे वाचवु शकतो.

## परळी न.प. निवडणुकीसाठी भाजपच्या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरून द्यावेत : जुगलकिशोर लोहिया

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**परळी :** भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजपने इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज भरून घेण्यास सुरवात केली आहे. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात हे अर्ज उपलब्ध असून इच्छूक उमेदवारांनी 18 जुलैपर्यंत ते भरून द्यावेत असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांनी केले आहे.

**पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात अर्ज उपलब्ध; 18 जुलैपर्यंत अर्ज द्यावेत**



**भाजप संपूर्ण ताकदीनिशी उतरणार**

नगरपरिषद निवडणूकीच्या दृष्टीने भाजपने संपूर्ण ताकदीनिशी तयारी सुरू केली आहे. भाजपच्या इच्छूक उमेदवारांकडून उद्यापासून अर्ज भरून घेण्यात येणार आहे, त्यासाठी उमेदवारांना विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तो अर्ज संपूर्ण भरून द्यावयाचा असून त्यासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो पण जोडायचा आहे.

हा अर्ज पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात 12 तारखेपासून उपलब्ध आहेत. इच्छूक उमेदवारांनी 18 जुलैपर्यंत अर्ज भरून द्यावेत असे आवाहन शहराध्यक्ष लोहिया यांनी केले आहे.

## ओरिऑन सिटिकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या किडनी प्रत्यारोपण विभागाची यशस्वी वाटचाल

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** ओरिऑन सिटिकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपण विभागाची सुरुवात जानेवारी २०२२ पासून झाली. यामध्ये आजपर्यंत १० यशस्वी किडनी प्रत्यारोपण झालेले आहेत. यामध्ये रक्तगट जुळत असलेले किडनी प्रत्यारोपण, रक्तगट जुळत नसलेले किडनी प्रत्यारोपण, अदला बदली असलेले किडनी प्रत्यारोपण, अवयदानातून प्राप्त झालेले किडनी प्रत्यारोपण अशाप्रकारचे किडनी प्रत्यारोपण आजपर्येंत हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या झाले असून सर्व पेशंट व डोनर निरोगी आयुष्य जगत आहेत.

हॉस्पिटलमध्ये कोविड काळानंतर मराठवाड्यातील दुसरे अवयवदान झाले आहे. या अवयवदानामध्ये दोन रुग्णांना किडनी, एक यकृत, एक हृदय रुग्णांना प्राप्त झाले असून ज्या रुग्णांना हे अवयव मिळाले आहे त्यासर्वांची प्रकृती उत्तम आहे व प्रत्यारोपण हि यशस्वी झाले आहे. अवयवदानाबद्दल जनजागृती व्हावी यासाठी हॉस्पिटलमध्ये अनेक उपक्रम घेण्यात येत आहेत तसेच यामाध्यमातून ज्या रुग्णांना डोनर उपलब्ध नाही अशा रुग्णांसाठी नोंदणी हॉस्पिटलमार्फत करण्यात येत आहे. ज्या रुग्णांकडे रक्तगट जुळत नसलेला डोनर असेल त्यांना आदी प्रत्यारोपणासाठी पुणे मुंबईला जावे लागत होते व खर्चिक प्रत्यारोपण करावे लागत होते परंतु रक्तगट जुळत नसलेले किडनी प्रत्यारोपणची सुरुवात या हॉस्पिटलमध्ये झाली आहे. अशाप्रकारचे पहिले किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या पार पडले आहे. ज्या रुग्णांनकडे रक्तगट जुळत नसलेले डोनर असतात अशा दोन जोड्यांची अदला बदल करून त्यांचे किडनी प्रत्यारोपण घडवून आणले जाते याला अदला बदली असलेले किडनी प्रत्यारोपण असे म्हणतात. अशाप्रकारचे किडनी प्रत्यारोपण सुद्धा हॉस्पिटलमध्ये झाले असून स्वॅप पेशंटसाठी स्वॅप नोंदणीची सुरुवात आपण केली आहे. त्याच प्रकारे रक्तगट जुळत असलेले किडनी प्रत्यारोपण गुंतागुंतीच्या अवघड शास्त्रक्रिया आपल्या रुग्णालयामध्ये यशश्वीरित्या झाले आहे. आजपर्यंत सर्व किडनी प्रत्यारोपण शास्त्रक्रिया झालेले रुग्ण निरोगी व नॉर्मल आयुष्य जगत आहे.

समाजामध्ये अवयवदान काळाची गरज आहे त्याबाबतीत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी म्हणून यामध्ये सर्वांचा पुढाकार हवा. त्याचप्रमाणे किडनी आजाराबद्धल माहिती असणे व वेळेत उपचार करणे गरजेचे आहे. व गरज पडल्यास किडनी प्रत्यारोपण हा एक चांगला मार्ग आहे. अशी माहिती वरिष्ठ किडनी विकार व किडनी प्रत्यारोपणतज्ञ डॉ. श्री गणेश बर्नेला यांनी दिली.

ओरिऑन सिटिकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये भविष्यात अत्याधूनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपचार रुग्णांना मिळावा यासाठी हॉस्पिटल प्रयत्नशील आहे. यामध्ये हृदयरोग, मेंदुरोग, मेंदुशास्त्रक्रिया, छातीरोग, अतिदक्षता, कान नाक घास, अस्तिरोग, मूत्ररोग विभाग व किडनी प्रत्यारोपण विभागासाठी अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त विशिष्ट डॉक्टर, स्टाफ, वार्डरूम्स, IUC, ऑपरेशन थियेटर यांची सुविधा देखील उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे किडनी प्रत्यारोपन सर्जन, विशेष भूलतज्ञ टीम, आपल्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

तसेच इतर हॉस्पिटलच्या तुलनेमध्ये माफक दरामध्ये किडनी प्रत्यारोपणाची सुरुवात केली आहे. भविष्यामध्ये काळानुरूप होणाऱ्या बदलानुसार नवतंत्रज्ञानाचा वापर करून किडनी प्रत्यारोपण केले जाईल याचा फायदा रुग्णांना मोठया प्रमाणात होईल, अशा सुविधांचा लाभ रुग्णांनी घ्यावा अशी माहिती हॉस्पिटलचे CMD डॉ. आशिष देशपांडे, CEO डॉ. वीरेंद्र वडगावकर, व हॉस्पिटल व्यवस्थापन समितीचे डॉ. शिरीष देशमुख, डॉ.योगेश वरगंटवार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. सुनील जाधव, डॉ. पांडुरंग वट्टमवार, डॉ. प्रविण सोनवतीकर, डॉ.राजकुमार घुमरे, डॉ. योगेश देवगिरीकर यांनी दिली.

## ज्येष्ठ पत्रकार नागनाथ जाधव यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** साप्ताहिक लोक जगतचे संपादक, दैनिक लोकपत्रचे बीड जिल्हा प्रतिनिधी, दैनिक लोकसत्ताचे प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हा उपाध्यक्ष नागनाथ व्यंकटराव जाधव यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवार दिनांक 12 जुलै 2022 रोजी मध्यरात्री दरम्यान दुःखद निधन झाले. ते नांदेड जिल्ह्यातील जाकापूर तालुका कंधार येथील मूळ रहिवासी होते. त्यांच्या पार्थिवावर बुधवार दिनांक 13 जुलै रोजी दुपारी 1.30 वाजता मोठ्या मुलीने अग्नीडाग दिला. भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील वैकुंठधाम स्मशानभूमी, बीड येथे भर पावसात शोकाकुल वातावरणात साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या पार्थिवावरील अंत्यसंस्कारास वृत्तपत्रसृष्टीसह सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्येष्ठ संपादक, पत्रकार नागनाथ जाधव यांचे काही दिवसापूर्वी छातीत दुखू लागल्याने एन्जोप्लास्टी सर्जरी करण्यात आली होती. त्यानंतर ते व्यवस्थित होऊन कार्यरत झाले होते. मात्र तेव्हापासून त्यांना पूर्वीप्रमाणे तब्येत साथ देत नव्हती. काही दिवसांपूर्वी ताप आली होती. डॉक्टरांनी कावीळ झाल्याचे निदान केले होते, मात्र त्यातून ते सावरले होते. मंगळवार दिनांक 12 जुलै रोजी ते दैनिक लोकसत्ता कार्यालयात नेहमीप्रमाणे आले. सर्व कर्मचाऱ्यांच्या मासिक पगारी केल्या. सर्वांशी हसून खेळून बोलून ते नेहमीप्रमाणे दुपारी घरी गेले. दिवसभर पाऊस असल्याने ते दुपारनंतर घरीच थांबले. सायंकाळी जेवण करून झोपी गेले. रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान त्यांना अचानक छाती त्रास होऊ लागला. वेदना असह्य झाल्या, घरीच उलटी देखील झाली. दरम्यान त्यांना कुटुंबीयांनी तात्काळ दीप हॉस्पिटल येथे दाखल केले. डॉक्टरांनी उपचार सुरू केले मात्र त्यांनी कसलाही प्रतिसाद दिला नाही. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने



त्यांची प्राणजोत मालवली होती. त्यांच्या पश्चात पत्नी सुभद्रा नागनाथ जाधव, मोठी मुलगी वर्षा दीपक डावकर, दुसरी मुलगी महानंदा चेतन इंगोले आणि सर्वात लहान मुलगी मानसी नागनाथ जाधव असे कुटुंब असून त्यांच्या पश्चात आई श्रीमती चौत्राबाई वेंकटराव जाधव, मोठी बहीण ममता गोपाळराव हंबर्डे, मंगलबाई धोंडगे, राणीबाई श्रीनिवास जाधव, तसेच लहान भाऊ विलास, प्रकाश आणि गोपाळ व्यंकटराव जाधव असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बार्शी रोडवरील भगवान बाबा प्रतिष्ठान जवळ असलेल्या वैकुंठधाम स्मशानभूमीमध्ये शोकाकुल वातावरणात बुधवार दिनांक 13 जुलै 2022 रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मोठ्या मुलीने त्यांच्या पार्थिवाला अग्नीडाग दिला. अंत्यविधीस प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियातील सर्व प्रतिष्ठित संपादक, पत्रकार, कर्मचारी वृंद तसेच जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर यांनी शोक संदेश पाठवून जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने गजानन शिंदे आणि कांडेकर यांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे म्हणाले, मागील 24 वर्षापासून नागनाथ जाधव हा माझा केवळ कर्मचारी नसून कुटुंबातील एक सदस्य झाला होता. अत्यंत विश्वासू ,सकारात्मक दृष्टी आणि कायम हसमुख असलेल नेतृत्व मी आज गमावले आहे. कदाचित माझी पुण्याई होती म्हणून मला नागनाथ जाधव सारखा सहकारी मिळाला. ही उणीव कधीही भरून निघणार नाही. पत्रकार नागनाथ जाधव कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक आधुनिक केसरी आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई परिवार सहभागी आहे.



# ‘सिंहमुद्रे’वरुन टीका

आधुनिक केसरी

नवीन संसदभवनाच्या दर्शनी भागावर, भारताचे राष्ट्रीय मानचिन्ह असलेल्या अशोक स्तंभातील सिंहमुद्रेची प्रतिकृती बसवण्यात आली असून तिचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच झाले. परंतु ही प्रतिकृती सध्या वादाच्या केंद्रस्थानी आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रतीकाच्या अनावरणप्रसंगी विरोधी पक्षियांना बोलावले गेले नाही, हा एक आक्षेप. दुसरा अधिक गंभीर आक्षेप प्रत्यक्ष सिंहमुद्रेच्या स्वरूपाविषयी आहे. या मुद्रेतील सिंह मूळ सिंहांच्या तुलनेत निष्कारण दात विचकणारे, बटबटीत, आक्रमक असल्याची टीका अनेकांकडून होत आहे. संसदेच्या आवारात नवे संसदभवन उभारले जात असून या इमारतीच्या दर्शनी भागावर राष्ट्रीय मानचिन्ह असलेल्या अशोक स्तंभावरील सिंहमुद्रेची प्रतिकृती बसवण्यात आली आहे. तिचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. या समारंभाला लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश उपस्थित होते. मात्र, विरोधी पक्षांच्या एकाही सदस्याला समारंभासाठी निमंत्रण देण्यात आले नव्हते. राष्ट्रीय मानचिन्ह वा संसदभवन जनतेचे प्रतिनिधित्व करतात, त्यावर फक्त केंद्र सरकारचा वा सत्ताधारी पक्षाचा अधिकार असत नाही. संसद सरकार आणि विरोधकांची मिळून बनते. त्यामुळे संसदेतील समारंभाला विरोधकांनाही सहभागी करून घ्यायला हवे होते. मोदींनी कोणाचीही दखल न घेता मानचिन्हाच्या नव्या प्रतिकृतीचे अनावरण केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. सम्राट अशोकाने देशात विविध ठिकाणी युद्ध आणि शांततेचे प्रतीक असलेले स्तंभ उभे केले. या स्तंभावर असलेल्या चारही सिंहांच्या चेहऱ्यावर शांत भाव प्रकट होतात. हे सिंह आत्मविश्वासाचे प्रतीक आहेत. पण, मूळ सिंहमुद्रेच्या वैशिष्ट्यांकडे, आत्मगुणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले असून नव्या प्रतिकृतीतील सिंह उग्र आणि विनाकारण आक्रमक दिसतात. ही सारनाथमधील सिंहमुद्रेची प्रतिकृती आहे की, गीरच्या सिंहांचे विकृतीकरण, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला आहे. नव्या प्रतिकृतीमध्ये सिंहांच्या मूळ गुणधर्म, स्वभावधर्मात बदल केलेला आहे. हे संविधानाचे स्पष्टपणे उल्लंघन आहे, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी केला आहे. राष्ट्रीय मानचिन्हामध्ये कोणताही बदल करण्यास मनाई करणारा कायदा २००५ मध्ये करण्यात आला होता. पण, मोदी सरकारने या कायद्याचेही उल्लंघन केले आहे. सिंहमुद्रेतील बदल लज्जास्पद असल्याची टीका तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार जवाहर सिरकार यांनी केली आहे. राष्ट्रीय मानचिन्हावर ‘सत्यमेव जयते’ लिहिलेले आहे. पण नव्या प्रतिकृतीला मोदी सरकारने ‘संघीमेव जयते’ बनवलेले आहे, अशी टीका तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा यांनी केली आहे. उग्र, आक्रमक आणि संतप्त सिंहमुद्रा ही मोदी युगातील नव्या भारताचे प्रतीक असल्याचाही आरोप विरोधक करत आहेत. सम्राट अशोक याची राजधानी उत्तर प्रदेशातील सारनाथ येथे इस. पूर्व २५० मध्ये सिंहमुद्रा असलेला स्तंभ उभारला होता. अशोकाच्या काळात देशभर असे स्तंभ उभारले गेले. या स्तंभांवर चार सिंहांची मुद्रा बसवलेली आहे. वाराणसीपासून काही अंतरावर असलेल्या सारनाथमधील संग्रहालयामध्ये मूळ सिंहमुद्रा ठेवण्यात आली आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर अशोक स्तंभावरील सिंहमुद्रा राष्ट्रीय मानचिन्ह म्हणून स्वीकारण्यात आले.

# मानसिक स्वातंत्र्याच्या दिशेने पुढचे पाऊल !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**लुटीयन्स दिल्ली म्हणजेच नवी दिल्लीतील डावे, तथाकथित पुरोगामी मंडळी यांचा अड्डा ! लुटीयन्स हे नाव ज्या पद्धतीने संबोधले गेले त्यात लुटीयन्स याचे कर्तृत्व सिद्ध होते. पण हे आता सर्वांना समजून येत आहे. नवीन संसद भवन हे त्रिकोणी आकारात स्थापित होते. ज्याचा थेट संबंध आमच्या वैदिक संस्कृतीशी जोडला जातो. आमच्या संस्कृती आणि परंपरेतील अनेक गोष्टी ह्या विज्ञानाच्या आधारित होत्या पण दुर्दैवाने त्या टाकाऊ ठरवल्या गेल्या. आमच्या योग संस्कृतीला जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वैश्विक मान्यता मिळवून देणारे पंतप्रधान मोदीजी आता पुन्हा या सर्वांना प्रस्थापित करत आहेत ते बघून अनेकांचे उर भरून येतात.**

देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. हजारों नव्हे लक्षावधी स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारक यांच्या बलिदानातून आम्ही हे स्वातंत्र्य प्राप्त केले. हे स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी आम्हाला आमच्या देशाचे दोन तुकडे झालेले बघावे लागले. फाळणीच्या त्या दुःखद वेदना आणि त्यावेळी झालेले निष्पाप हिंदू स्त्रीयांवरचे अत्याचार हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आम्ही मोजलेली किंमत आहे. आमचे लाखो हिंदू बंधू विस्थापित झाले, स्वतःचे घरदार सोडून इकडे आले. नरसिंह मंदिर, तक्षशिला विद्यापीठ आणि शीख गौरव स्थाने आम्हाला उध्वस्त होताना बघावी लागली. स्वातंत्र्यासाठी ही मोजलेली किंमत आम्हाला कधी समजलीच नाही.

जणू काही आम्ही नव्याने हा देश  बनवत आहोत या अविर्भावात आम्ही आमच्या जुन्या सगळ्या गोष्टी विसरत गेलो. आधी मुस्लिम आणि नंतर इंग्रज शासकांनी आमच्यावर अधिराज्य गाजवताना अनेक आमच्या गुलामगिरीची स्मारके बनवली होती. खरे तर अशी सर्व स्थाने एक तर नष्ट करणे किंवा त्याची पुनर्स्थापना करणे हे स्वातंत्र्या नंतर आलेल्या राज्यकर्त्यांच प्रथम कर्तव्य होते. पण दुर्दैवाने आंग्लाळलेले शासक आणि मेकॉले पुत्र निर्मित प्रशासकीय व्यवस्था याच्या संयुक्त कारभारात आम्ही तांत्रिक दृष्ट्या नक्की स्वतंत्र झालो पण आम्ही मानसिक दृष्ट्या पारतंत्र्यातच राहिलो हे कठोर सत्य आहे.

या मानसिक पारतंत्र्यामुळे आम्ही आमच्या अनेक पिढ्या या स्वतंत्र भारताच्या नैसर्गिक सहज भावापासून दूर ठेवले, परिणामस्वरूप या देशाच्या स्वातंत्र्यसाठी प्रयत्न करणाऱ्या असंख्य नेत्यांच्या मनातील भारत हा स्वप्नवतच भासत राहिला. विज्ञान आधारित, तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या नव्या पद्धतीत आम्ही भौतिक सुखाचे पोशिंदें झालो. त्यामुळे जगात आमची स्वामी विवेकानंद यांनी वर्णन केलेली निहित कर्तव्ये आम्ही विसरून गेलो. कारण मानसिक गुलामगिरीची आमची सवय जात नव्हती.

भारताचा आत्मा असलेले अध्यात्मिक तत्वज्ञान आणि ग्रंथ संपदा आम्ही अडगळीत टाकले आणि भलत्याच मोहजालात फसत गेलो. राष्ट्रीय स्मारके कोणती? हे आम्हाला कळलेच नाही त्यामुळे एकीकडे आमच्या  अनेक शूर-वीरांचे पराक्रमाच्या साक्षी असलेल्या वास्तू धूळ खात पडल्या तर दुसरीकडे नको त्या वास्तू गौरवनकीत झाल्या! राणीचा बाग, व्हीकटोरिया टर्मिनल, अकबर रोड, औरंगजेब मार्ग असे फलक आमच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेला वाकुल्या दाखवत असताना आम्ही कमालीचे निर्विकार झालो होतो. अलाहाबाद, औरंगाबाद, फैजाबाद सारख्या शहरांची नावे बदलण्यासाठी ६०/७० वर्षे वाट बघावी लागणे या सारखी मानसिक पारतंत्र्याची आणखी काय ओळख सांगायची?



आज हे सगळे आठवत आहे कारण काल नव्या संसद भवनाच्या छतावर स्थापित करण्यात येणाऱ्या मानचित्राची यथासांग पूजा करून खऱ्या अर्थाने भारतीय संसद भवन हे आता त्याच्या कामकाजाच्या अंतिम टप्प्यात आले आहे. संपूर्ण भारतीय संस्काराचे रेखाटन असलेले हे संसद भवन देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षातील खऱ्या अर्थाने उपलब्धी असणार आहे.

ज्या संसद भवनात आतापर्यंत कामकाज चालू आहे त्याचा आर्किटेक्ट लुटीयन्स नावाचा इंग्लिश माणूस होता. ज्याला या देशाच्या संस्कृतीशी, परंपरेशी काही घेणे देणे नव्हते त्यामुळे त्याने संसदेच्या छतावर केलेले रेखाटन हे आम्हाला एक प्रकारे खिजवणारेच होते पण ७५ वर्षात आलेल्या कुठल्याही सरकारला ते बदलावे असे वाटले नाही कारण त्यात वावगे वाटावे अशी मानसिकताच त्यांची नव्हती.

लुटीयन्स दिल्ली म्हणजेच नवी दिल्लीतील डावे, तथाकथित पुरोगामी मंडळी यांचा अड्डा ! लुटीयन्स हे नाव ज्या पद्धतीने संबोधले गेले त्यात लुटीयन्स याचे कर्तृत्व सिद्ध होते. पण हे आता सर्वांना समजून येत आहे.

नवीन संसद भवन हे त्रिकोणी आकारात स्थापित होते. ज्याचा थेट संबंध आमच्या वैदिक संस्कृतीशी जोडला जातो. आमच्या संस्कृती आणि परंपरेतील अनेक गोष्टी ह्या विज्ञानाच्या आधारित होत्या पण दुर्दैवाने त्या टाकाऊ ठरवल्या गेल्या. आमच्या योग संस्कृतीला जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वैश्विक मान्यता मिळवून देणारे पंतप्रधान मोदीजी आता पुन्हा या सर्वांना प्रस्थापित करत आहेत ते बघून अनेकांचे उर भरून येतात.

अर्थात ज्यांना हे सहन होत नाही ते वेगवेगळ्या व्यासपीठावर वेगवेगळ्या माध्यमातून कुठल्या गोष्टीत वाईट कसे काढता येईल हे बघत आहेत? आता ही तीन सिंहाची मुद्रा म्हणे क्रोधीत दाखवण्यात आली आहे, मूळ अशोक स्तंभात तशी नाही ती शांत आहे वगैरे, वगैरे ! कदाचित देशाच्या मानसिक स्वातंत्र्याच्या बदलाचा तो नकळत परिणाम असेल पण क्रोधीत नव्हे तर शॉर्य दर्शवणारी ती मुद्रा आहे आणि खंडित भारताला अखंडित करण्याचा मानस व्यक्त करणारी ती मुद्रा आहे. आक्रमण कराल तर प्रतिकार सिद्ध करणारी ती मुद्रा आहे. आत्मनिर्भर भारताच्या हुंकाराची ती मुद्रा आहे. ज्यांना हे समजत नाही त्यांना जनतेने झिडकारले आहे कारण जनतेला मानसिक स्वातंत्र्य हवे आहे !

अर्थात मोदीजी ना या टीकाकारांना उत्तर द्यायला वेळ नाही. २०१४ साली संपूर्ण बहुमताने निवडून आल्यावर पंतप्रधान मोदी एक क्षणही हे विसरलरले नाहीत की ते त्या ठिकाणी कशासाठी विराजमान आहेत आणि त्यामुळे व्यवस्थेच्या माध्यमातून भारतीय समाजाला मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी त्यांचे यथाशक्ती प्रयत्न चालू आहेत.

परदेशी पाहुण्यांना भारतीय संस्कृतीचे द्योतक असणाऱ्या भेटी देण्यापासून वाराणसीच्या जिर्णोध्दारापर्यंत आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला कृतीत आणण्यापासून ते संसदेच्या पुनर्निर्माणा पर्यंत त्यांच्या सर्व कृतीमागे देशाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात भारतीय समाजाला मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढण्याचा एक निश्चित उद्देश आहे त्यामूळे त्यात कुठल्याही प्रकारे न्यूनगंड न बाळगता ते करत असलेल्या प्रयत्नांच्या मागे आपण उभे राहू या !

# देशाचं भविष्य हतबल होता कामा नये...

आधुनिक केसरी

**आणि गरीब अधिक गरीब होत चाललाय. मुळात या मस्तवाल पैश्यावल्यांना पैशाचा खूप माज असतो,  खरं तर या सगळ्या गोष्टीसाठी मी इथल्या व्यवस्थेला इथल्या सिस्टमला आणि इथल्या राज्यकर्त्यांना धारेवर धरेल जर मुलं देवाघरची फुलं आहेत आणि ते या देशाचं भविष्य आहे, तर या देशाच्या भविष्यावर भीक मागायची वेळ का येते याला कोण जबाबदार ? मी सरळ राज्यकर्त्यांवर आरोप घेईल की तुम्ही स्वतःला सरकार म्हणवून घेतात राज्यकर्ते म्हणवून घेतात पुरोगामी म्हणवून घेतात मग या विषयाकडे गांभीर्याने लक्ष का देत नाही.**



काही दिवसआधी सोशल मीडियावर एका चिमुकलीचा विडिओ बघितला आणि नकळत डोळ्यात पाणी आलं समजलचं नाही, कोणीतरी समाजकंटक एका चिमुकलीला पैशाचं आमिष दाखवून मिरची खायला लावतो, आणि फक्त पैशासाठी नाही तर माजबुरीने ती मुलगी ती तिखट मिरची खाते,तीला तिखट लागत पण ती समोरच्याला समजू देत नाही,

पण तोंडाला लागलेल्या तिखटामुळे तिचे अश्रू अनावर होतात, एका बाजूला पैशे मिळण्याचा आनंद तर दुसरीकडे डोळ्यात पाणी. विचार येतो गरिबीची मजाक न घेता सरळ हाताने मदत जर केली असती तर काय बिघडलं असतं.

आज पुन्हा एक प्रसंग समोर आला, एक छोटं बाळ ज्याला त्याच नाव सुद्धा निट सांगता येत नव्हतं ते बाळ भीक मागताना दिसलं. त्याला जवळ घेऊन विचारणा केली तर त्याला नीट बोलायला सुद्धा येत नव्हतं. या देशाचं भविष्य अस हतबल बघून खूप वाईट वाटलं त्या बाळाला चहा प्यायला दिला खायला पैसे दिले आणि विचार करत पुढे निघालो, जिथे तिथे लोकं गरिबाला परीक्षा का द्यायला लावतात.या देशात श्रीमंत अधिक श्रीमंत होत चाललाय आणि गरीब अधिक गरीब होत चाललाय. मुळात या मस्तवाल पैश्यावल्यांना पैशाचा खूप माज असतो, खरं तर या सगळ्या गोष्टीसाठी मी इथल्या व्यवस्थेला इथल्या सिस्टमला आणि इथल्या राज्यकर्त्यांना धारेवर धरेल जर मुलं देवाघरची फुलं आहेत आणि ते या देशाचं भविष्य आहे, तर या देशाच्या भविष्यावर भीक मागायची वेळ का येते याला कोण जबाबदार? मी सरळ राज्यकर्त्यांवर आरोप घेईल की तुम्ही स्वतःला सरकार म्हणवून घेतात राज्यकर्ते म्हणवून घेतात पुरोगामी म्हणवून घेतात मग या विषयाकडे गांभीर्याने लक्ष का देत नाही.

या देशात नोकरदार वर्गापेक्षा भीक मागणाऱ्यांचं प्रमाण जास्त आहे, हे चित्र कधी बदलेल कुणास ठाउक राज्यकर्ते शिव फुले शाहू आंबेडकर या महापुरुषांचे नाव आवर्जून त्यांच्या भाषणात घेतात, त्यांचे स्मारक बनवतात भाषणातून सांगतात महामानवांना अभिप्रेत असलेला समाज घडवणार, तर माझा थेट आरोप आहे की कुठली वाटचाल आहे तुमची परिवर्तनाकडे.

आज या देशात शेतकरी आत्महत्या करतो आणि आत्महत्या केल्या नंतर सरकार त्या शेतकऱ्याला मदत करत, पण या देशातील एकाही शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची वेळच येणार नाही अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजे महामानवांना अभिप्रेत असलेला समाज घडवणे, भिकाऱ्यावर दया करणे त्याला पाच रुपये देने दहा रुपये देने ही दया झाली परंतु त्या भिकाऱ्यावर भीक मागायची वेळच येणार नाही अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजे महामानवांना अभिप्रेत असलेला समाज निर्माण करणे, आणि म्हणूनच ही माझी आंतरिक हाक आहे की कमीत कमी या देशाचं भविष्य असलेले बालक बालिका हे भीक मागताना वा कोणासमोर हतबल व्हायला नको त्यासाठी सरकार व प्रशासनाने तजवीज करायला हवी.

ज्या दिवशी हे परिवर्तन घडेल त्याच दिवशी हा भारत देश खऱ्या अर्थाने महासत्तेकडे वाटचाल करेल. छोटे मुल भीक मागताना दिसल्यास पोलीसांनी कारवाई केली पाहिजे, व परिसरातील व्यापारी वर्गाने गरजूंना रोजगार दिला पाहिजे.

-राजेश गवई, संपर्क क्र. ७७७३९८८३२०

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभु व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेख अब्दुल्ला, फारुख अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला

आधुनिक केसरी



**जम्मु काश्मीर भारताचे मस्तक. हरियाली आणि निसर्ग सौंदर्य, बर्फाच्छादित स्वर्गच म्हणाना. अशा या सुवर्णमयी राज्याच्या निर्मितीपासूनच दुष्ट इंग्रज शासकांच्या षड़यंत्रामुळे वाद उत्पन्न झालेत ते आजतागायत चालूच आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू, महंमद अली जिना, आणि शेख अब्दुल्ला या तीन भावांनी मिळून मोहनदास करमचंद गांधी या माणसाला ब्लॅकमेल करत हिंदुस्थानचे तीन तुकडे करून घेतले आणि जम्मु काश्मीर वादग्रस्त राज्य केले. जेंव्हा भारतीय स्वातंत्र्य लढा जोर धरू लागला तेंव्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुसलमानांना भडकवायला आणि स्वतंत्र राष्ट्र घेण्याच्या मागणी साठी लढायला उद्युक्त केले. "मजबुरी का नाम महात्मा गांधी " ही स्लोगन तिथूनच अस्तीत्वात आली आहे.**

महात्मा गांधी यांना या तीन भावांनी अक्षरशः मजबूर केले. आणि पाकिस्तान पूर्व आणि पश्चिम उदयाला आले. एवढ्यावर समाधान झाले नाही म्हणून या तिघांनी डाव खेळला. आणि स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र दिल्यावर आणि दोन्ही पाकिस्तानमधील हिंदूंची निर्घृण हत्या करूनही यांचे समाधान झाले नाही.

भविष्यात भारत भूमीही मुस्लिम राष्ट्र करता यावी म्हणून बरीच मोठी संख्या भारतातच राहू दिली. हे षडयंत्र या तिघांनी मिळून महात्मा गांधींना वेठीस धरुन राबवले. पाकिस्तान महमंद अली जिना यांना आंदन दिला. भारत नेहरूंच्या ताब्यात दिला. त्यावेळी सुभाषचंद्र बोससारखे विरोध करतील हे ध्यानात घेऊन आधीच त्यांचा बंदोबस्त केला. सरदार वल्लभभाई पटेल,स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना बदनाम करण्याचे प्रयत्न करून त्यांना बांधीत केले आणि भारत पाकिस्तान फाळणी झाली हिंदुस्थानची. नंतर शेख अब्दुल्ला यांनी या दोन भावांविरोधात आवाज उठवला आणि माझी सोय करा असा आग्रह धरला परिणामी जम्मू-काश्मीर त्यांना दान दिले. त्यांचे समाधानासाठी तीनशे सत्तर कलम आणि 35 ए हे कायदे पारीत करून भारतापासून वेगळे अस्तित्व निर्माण केले. हे करतांना भारतीय संघराज्यातील बाकी राज्यातील भारतीय नागरिक जम्मू काश्मीरमध्ये स्थायिक नाही होऊ शकणार, प्रॉपर्टीज् नाही घेऊ शकणार. अशी तरतूद केली परंतू त्याच वेळी तेथील नागरिक मात्र भारतात कुठेही संचार करू शकतील, खरेदी विक्री करू शकतील, शिक्षण घेऊ शकतील. विवाह संबंध जूळवू शकतील आशा अटी शर्थी त्यात होत्या. शेख अब्दुल्ला नंतर फारूक अब्दुल्ला सत्तेत आले. आयुष्यभर पाकिस्तान धार्जिणे निर्णय घेत आणि भारत विरोधी वातावरण निर्माण करत यांचे राजकारण चालू आहे. इतकी टोकाची भूमिका घेत असतांनाही भारत सरकार यांचे विरोधात काहीही प्रतिबंधात्मक कारवाई करत नाही किंवा करू धजावत नाही याचे आश्चर्य वाटते. हे आपले दुर्भाग्य आहे.

परवा अमित शाह यांनी तिरंगा फडकवत भारतभर तिरंगा यात्रा काढायचे जाहीर केले तेंव्हा सर्वप्रथम या फारुख अब्दुल्ला यांनी कडाडून विरोध केला. अशा या पाकधार्जिण्या आणि भारत विरोधकाला भारताचे विरोधीपक्ष राष्ट्रपती पदाचे उमेदवार करायला निघाले होते. यांचे पुत्र उमर अब्दुल्ला हेही याच माळेतील मणी आहेत. मेहबुबा मुफ्ती, तीचे पिता मुफ्ती महंमद सईद हे सगळेच उघड उघड पाकिस्तान धार्जिणे वागतात, बोलतात, भाषणे ठोकतात. तरीही आपण त्या मलीकविरूध्द केली तशी कारवाई का नाही करू शकत हे एक कोडेच आहे.

जम्मू काश्मीर भारतमातेचे मस्तक आहे. म्हणजेच ते अभेद्य अंग आहे. याच जम्मु काश्मीरचा खुप मोठा भूभाग (बांगलादेश पेक्षाही मोठा भूभाग) गेली पन्नास एक्कावन्न वर्षे पाकव्याप्त काश्मीर म्हणून पाकिस्तानच्या ताब्यात आहे. तोही कॉंग्रेस नेत्यांच्या मुर्खपणा मुळे. कॉंग्रेसने स्वातंत्र्य प्राप्ती पासूनच जम्मू काश्मीर बाबत वेगळी भूमिका घेत देशाच्या अखंडतेला आणि एकात्मतेला अपशकून करणाऱ्यांच्या पाकिस्तानधार्जिण्या विचार सरणीला खतपाणी घातले आहे.


1971 मध्ये मोठे युध्द केले, पाकिस्तानवर निर्विवाद विजय मिळवत पूर्व पाकिस्तान स्वतंत्र करत बांगलादेश निर्माण केला.

त्यावेळी भारतीय सैन्य पार लाहोरपर्यंत पाकिस्तानमध्ये घुसलेले असतानाही आणि तमाम पाकिस्तानी सैन्यदल त्यांच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांसह शरण आलेले असताना, भारताचा भूभाग मुक्त करून घेऊन, दहशतवाद विरोधी करार त्यांचेशी करणे शक्य असतानाही रणरागिणी इंदिरा गांधी यांनी संधी दवडली आणि तह करून आपला भूभाग मुक्त करून घेतलाच नाही. ती मोठी संधी इंदिराजींनी दवडली ती कोणत्या उद्देशाने हे आजतागायत कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांनी समजू दिलेले नाही.

आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की पाकव्याप्त काश्मीरमधील जनता ही भारत मदतीला येत नाही असे पाहून नाराज झालेली आहे. चीन ने या बाबीचा फायदा घेत पाकव्याप्त काश्मीरमधील बराच भूभाग चीनला दिला आहे. तेथून रस्ते तयार करून भारताच्या शत्रूला वाव दिला आहे. नरेंद्र मोदी सरकार हरसंभव प्रयत्न करत आहेत आणि 2024 पर्यंत हा भारताचा प्रदेश भारताच्या ताब्यात आणतील असे वाटत आहे. तरीही कॉंग्रेसचे हे पाप भारतीय जनतेला खुलासेवार माहीत होणे गरजेचे आहे.

नेहरू गांधी घराण्यांनी भारताचे तुकडे करण्याचे महापाप केलेले आहे. अखंडपणे देशाच्या साधनसामग्री ची तसेच सार्वजनिक मालमत्तांची आणि प्रामाणिक करदात्यांच्या पैशांची लूट चालवली आहे. आज नेहरू गांधी घराण्यांकडे लाखो करोड रुपयांच्या संपत्ती आहेत. त्यांचा स्वतःचा कोणताही उत्पन्नाचा व्यवसाय उद्योग नसताना. सध्या राहूल गांधी, सोनिया गांधी जामीनावर बाहेर आहेत. आणि त्यांची वागणूक, वर्तणूक आम्हाला हात लावायची हिंमतच कोणातही नाही अशी आहे.

जम्मू काश्मीर राज्यामधील अनेक नेत्यांनी आपल्या घरच्या मेंबरचे अपहरण झाल्याचे नाटक करून अनेक खुंखार आतंकवाद्यांना, अतिरेक्यांना आणि दहशतवाद्यांना जेलमधून मुक्त करायला भारत सरकारांना भाग पाडले होते. ही सर्व अपहरणाची प्रकरणे बोगस आणि बनवेगिरीची होती. आता मोदी सरकार असले नखरे खपवून घेत नाही आणि जागतिक स्तरावरील भारताची प्रतिमाही कमालीची सुधारलेली असल्याने आता कोणी असले बनाव करण्याची हिंमत करत नाहीत.

भारत सरकारने आता 370 आणि 35 ए रद्द केल्याने जम्मू काश्मीर मुख्य प्रवाहात येत आहे. भारतातील अनेक राज्ये काश्मिरींना हरप्रकारे मदत करायला पूढे येत आहेत. भारत सरकारनेही अनेक विकास प्रकल्प, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे चालू केली आहेत. तेथील सर्वसामान्य जनतेला ही आता स्थानिक नेत्यांची लबाडी, खोटारडेपणा, फूटीरतावाद लक्षात येत आहे. येत्या पाच वर्षात जम्मू काश्मीर पूर्वी सारखा म्हणजे 1947 च्या वेळेसचा शांत होईल. एकदा काश्मिरी पंडित परत तिथे वसले की सर्व सुरळीत होईल. फक्त भारतीय जनतेला कोणत्याही परिस्थितीत कॉंग्रेस किंवा तिचे पीलं सत्तेवर येणार नाहीत असे पाहावे लागेल.

**-पीपीएम पुणे**

# रुग्णसेवेचा विश्वास सांभाळतेय पुण्याचे कामगार रुग्णालय !



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

आधुनिक केसरी

**पुण्यातील मोहन नगर चिंचवड भागात भव्य कामगार सोसायटी रुग्णालय कामगारांना विश्वासाने रुग्णसेवा देताना दिसत आहे. या रुग्णालयाची स्थापना 12 फेब्रुवारी 2009 रोजी झाली. आणि म्हणूनच हे कामगार रुग्णालय 'सुंदर माझे कार्यालय' संकल्पनेत महत्वाचे ठरते आहे. रुग्णालयाची भव्यवस्तू,अॅलोपथी व आयुष अंतर्गत एकूण 21 विभाग यात मेडिसिन, सर्जरी, अस्थिरोग, बालरोग, नेत्ररोग, नाक-कान- घसा, स्त्रीरोग, चर्मरोग, कुटुंब नियोजन, लसीकरण, पॅथॉलॉजी, क्ष-किरण किरण ,ऑपरेशन थेटर, लेबर रूम, आपत्कालीन विभाग, क्षयरोग, छाती रोग ,आयुर्वेद, होमिओपॅथी ,युनानी पॅथॉलॉजी इत्यादी विभाग रुग्णांना सेवा देताना सतत कार्यरत राहत आहेत.**

**सुंदर माझे कार्यालय**
**भाग-5**

हे रुग्णालय चिंचवड मधील एकमेव शासकीय रुग्णालय आहे. जे की रुग्णांना सर्वसमावेशक दृष्टीने उपचार देण्यासाठी कटिबद्ध राहिले आहे. रुग्णालयात येणाऱ्या बाह्य रुग्णांची संख्या 350- 400 इतकी आहे. तर रुग्णालयाच्या कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत 4 लाख 95 हजार विमा कामगार आणि 19 लाख 80 हजार कामगार कुटुंबीय जुळले आहेत. येथे सर्वसमावेशक उपचार मिळत असल्याने तसेच योग प्रशिक्षकाची निवड केल्यामुळे रुग्णांना " निरोगी तन आणि शांती मन" याच्या अनुभूती होत आहे. मागील वर्षात (2021- 22) बाह्य रुग्णांची वार्षिक आकडेवारी 1 लाख 23 हजार 400 इतकी होती. विशेष म्हणजे महत्त्वाच्या विभागांची बाह्यरुग्ण विभागाची वेळ सकाळी नऊ ते चार अशी वाढविण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांचा रुग्णालयाप्रती विश्वास वाढल्याचे सुखदायी चित्र दिसून येत आहे.




**यंत्रसामुग्री दृष्टीक्षेप...**


- ओटी लॅम्प
- मल्टीपरा मॉनिटर
- अॅनेथेसिया मशीन
- सेंट्रिफयुज मशीन
- ब्लड सेल काउंटर
- इसीजी मशीन
- सीआरएस यंत्र
- सीपॅप मशीन
- पावर ड्रिल मशीन
- अद्यावत रुग्णवाहिका

रुग्णालयातील विविध विभाग, कक्ष ( वार्ड) येथील स्वच्छता, नीटनेटकेपणा मनास भावून जातो. अस्थिरोग सर्जरी, मेजर गायनीक सर्जरी इत्यादी मोठ्या शस्त्रक्रिया, HIP BIPLOIAR HEMIOTHOPLASTY सारख्या विशेष शस्त्रक्रिया येथे करण्यात आल्या आहेत. रुग्णांसाठी आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी आणि तसेच ऍलोपॅथिक औषधी 80 टक्के उपलब्ध आहेत. रुग्णालयात रुग्णसेवेचा आकृतिबंध तयार करून आधुनिकीकरणाचे पाऊल उचलण्यात आले आणि त्या दृष्टीने रुग्णालयाची वाटचाल नोंद घेण्यास पात्र ठरत आहे. शासनाच्या 25 नोव्हेंबर 2021 च्या शासन निर्णयानुसार आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 40 वर्षांवरील विमा कामगारांसाठी श्रमश्री व सुनेत्र प्रकल्पांतर्गत आरोग्य शिबिरे औद्योगिक वसाहतीत संपन्न झाली आहेत. कामगारांच्या इच्छेनुसार आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी योगा या सेवेचाही लाभ रुग्ण घेताना दिसत आहेत . ईएसआयसी तर्फे 13 खाजगी रुग्णालय टायअप करण्यात आले असून दुय्यम वैद्यकीय सेवेसाठी 19 रुग्णालय टाअप केले आहेत.

रुग्णांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे सन 2020-21 मध्ये विमाधारकांचे रुपये 1 कोटी आठ लाख 80 हजार 6 रुपये आणि सन 2021-22 मध्ये 753 विमाधारकांचे रुपये 3 कोटी 33 लाख 73 हजार 66 रुपये अदा करण्यात आले. तर दर महिन्याला 80 ते 90 प्रस्ताव येतात व त्याचा वेळेत निपटारा करण्यात येतो. रुग्णालयात निसर्गरम्य वातावरण राहावे म्हणून 40 झाडे लावण्यात आले असून त्याची जोपासना करण्यात आली असून ती पाच फुटापर्यंत वाढलेली दिसतात..जागतिक कर्करोग दिन, राष्ट्रीय बालिका दिन, रक्तदान शिबिर, जागतिक आरोग्य दिवस, जागतिक यकृत दिवस, जागतिक कामगार दिन, याचे विशेष कार्यक्रम अतिथीमार्फत साजरे करण्यात येतात. व त्यामुळे येथे आनंदी वातावरण पाहायला मिळते. रुग्णालयातील पाकशाळा अद्यावत केल्यामुळे रुग्णांना दर्जेदार आणि ताजे जेवण देण्याचा प्रयत्न रुग्णालयात होताना दिसतो.

"आयपी इज व्हीआयपी" या ब्रीद वाक्याप्रमाणे रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. भारती पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुसुदन पाठक, प्रशासन अधिकारी डॉ. विवेक नाईक यांच्यासह सर्व विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, मंत्रालय कर्मचारी, समवैद्यकीय कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी "सुंदर माझे रुग्णालय" यासाठी सतत क्रियाशील राहिलेले दिसत आहेत.

## आधुनिकीकरण रुग्णांसाठी होतेय याचा आनंद



मी या रुग्णालयाची वैद्यकीय अधीक्षक म्हणून 24 ऑगस्ट 2020 रोजी पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारतेवेळी अनेक अडचणी होत्या. सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने त्याबाबतचा आकृतीबंध तयार केला. पदभरती,आधुनिक यंत्रसामग्री, रुग्णांच्या अडीअडचणी , प्रतिपूर्ती देयके याकडे विशेष लक्ष देऊन रुग्णालयाची प्रतिमा उंचावली. म्हणून हे रुग्णालय नावारूपास आल्याचा आनंद होत आहे. सोसायटीचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ए . एन कारंजकर ,संचालक (वैद्यकीय) डॉ. संजय ढवळे, संचालक ( प्रशासन) महेश वरुडकर ,उपसंचालक ( प्रशासन ) डॉ. संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रुग्णालयातील सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने रुग्णालयाचे आधुनिकरण होत आहे याचा आनंद होत आहे.

**-डॉ .भारती पाटील, वैद्यकीय अधीक्षक,**
राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालय, मोहननगर चिंचवड पुणे.

# भिंत



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**मोठमोठया गृहसंकुलातून खाली वाहने उभे करून ठेवण्यासाठी जी जागा असते, त्यावर त्या त्या घरमालकाचा हक्क असतो हे खरे. पण स्वामित्वाचा हक्क गाजवण्याची केवढी हाव ! त्या जागेत कोणी प्रवेशसुद्धा करू नये म्हणून त्या जागेच्या इतर बाजू दोराने, साखळीने किंवा छोट्या भिंतीने बंद केलेल्या असतात. खाली असणाऱ्या प्रसाधनगृहांना देखील कडीकुलुपात बंदिस्त केलेले असते. कधी कोणाला ' घाई ' असली तरी त्याला त्याचा वापर करता येत नाही. याही एक प्रकारच्या भिंतीच नाही का? या सगळ्या तर दृश्य भिंती. पण मनामनातल्या अदृश्य भिंती फार मोठया असतात. त्या दिसत नाहीत पण जगण्यात फार मोठे अडथळे निर्माण करतात.**

आमच्या घरासमोर असणारा एक छान, प्रशस्त बंगला. आधीच्या मालकाने तो विकला आणि दुसऱ्या एका श्रीमंत व्यक्तीने तो विकत घेतला. तसा बंगला छान असला तरी तो बांधून अनेक वर्षे झाली होती. साहजिकच नवीन मालकाला आपण तेथे राहायला जाण्यापूर्वी त्याची दुरुस्ती, रंगरंगोटी नव्याने करावी असे वाटले. त्याप्रमाणे त्यांनी कामही सुरु केले. त्यांच्या शेजारी असेच एक छोटेसे दुमजली घर होते. त्या घरात खाली तळमजल्यावर एक आणि वरच्या मजल्यावर दुसरे अशी दोन भाडेकरू बिऱ्हाडे राहत होती. घराचे काम सुरु असल्याने त्या घरमालकाच्या दिवसातून अनेक वेळा चकरा होत असत. कधी कधी शेजारील भाडेकरुंकडे काही लागले तर तो जात असे. समोर किंवा आजूबाजूला राहणाऱ्यांकडेही तो जाई. त्याच्या बोलण्यातून एक नवा शेजारी आपल्या शेजारी येणार याची बाजूला राहणाऱ्या लोकांना जाणीव झाली. तो देखील शेजारी जाऊन तुम्ही सगळे किती चांगले आहात असे म्हणत असे. शेजारी देखील त्याला चहापाण्याचा आग्रह करीत. त्या नवीन घरमालकाच्या घराभोवती आणि शेजारच्या घराभोवती एक सामायिक अशा प्रकारची कुंपणाची भिंत होती. तिची उंची साधारण चार पाच फूट असावी. त्या भिंतीजवळ उभे राहून त्या घरमालकाला आणि त्याच्या शेजाऱ्याला सहज संवाद साधता येई, काही देवाणघेवाण करता येई. पण नवीन घरमालकाने घरदुरुस्तीचे काम सुरु केल्यानंतर पहिल्यांदा त्याने त्या भिंतीची उंची वाढवण्याचे काम सुरु केले. आता ती भिंत साडेसहा/सात फूट उंच झाली होती. शिवाय त्यावर लोखंडी खांब बसवून त्याला काटेरी तार लावण्यात आली.

मला या विरोधाभासाची मोठी गंमत वाटली. एका बाजूला शेजाऱ्यांकडे जायचे, त्यांच्याशी गप्पागोष्टी करायच्या आणि आपण आता शेजारी होणार आहोत असे सांगायचे. यापुढे वर्षानुवर्षे आपण शेजारी, आपले संबंध दृढ होतील. आणि दुसऱ्या बाजूला दोघांमध्ये अशी भिंत उभी करायची की एकमेकांना संपर्क साधता येणार नाही. मग जणू तू कोण आणि मी कोण? मला तुमची गरज नाही. तुम्ही तुमच्या भागात राहा, आम्ही आमच्या भागात. तो नवीन घरमालक असे काही म्हणाला नाही हे जरी खरे असले तरी त्याने उभ्या केलेल्या भिंतीतून हाच संदेश जणू जात होता. अशा संदेशांना शब्दांची गरज नसते. हा प्रकार म्हणजे ' शब्देविण संवादु (की विसंवादु ?)

अशा खूप कोतेपणाच्या भिंती आपण आपल्या आजूबाजूला उभारतो. मोठमोठया गृहसंकुलातून खाली वाहने उभे करून ठेवण्यासाठी जी जागा असते, त्यावर त्या त्या घरमालकाचा हक्क असतो हे खरे. पण स्वामित्वाचा हक्क गाजवण्याची केवढी हाव ! त्या जागेत कोणी प्रवेशसुद्धा करू नये म्हणून त्या जागेच्या इतर बाजू दोराने, साखळीने किंवा छोट्या भिंतीने बंद केलेल्या असतात. खाली असणाऱ्या प्रसाधनगृहांना देखील कडीकुलुपात बंदिस्त केलेले असते. कधी कोणाला ' घाई ' असली तरी त्याला त्याचा वापर करता येत नाही. याही एक प्रकारच्या भिंतीच नाही का?

या सगळ्या तर दृश्य भिंती. पण मनामनातल्या अदृश्य भिंती फार मोठया असतात. त्या दिसत नाहीत पण जगण्यात फार मोठे अडथळे निर्माण करतात. या अदृश्य भिंती असतात जाती, धर्म, भाषा, वर्ण, पंथ, प्रदेश इ. च्या. दृश्य भिंती कधी ना कधी पडतात. अदृश्य भिंती मात्र द्वेष, मत्सर, असूयाच्या सिमेंटने दिवसेंदिवस मजबूत होत जातात. पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनीत असलेली भिंत एक दिवस पडली. नव्हे लोकांनीच ती पाडून टाकली. साम्यवादी पूर्व जर्मनी आणि उदारमतवादी पश्चिम जर्मनी यांना विभक्त करणारी ही भिंत पडली आणि एका नव्या युगाचा सूर्योदय झाला असे लोकांना वाटले. पण मनामनातल्या भिंती थोड्याच पडतात. त्या टिकून राहाव्यात यातच काहींना रस असतो कारण त्यामुळेच त्यांचे अंतःस्थ हेतू साध्य होतात.

भिंतीचा उदय कसा झाला असावा असा विचार केला तर डोळ्यापुढे येतो तो आदिमानव. तो घनदाट अशा जंगलात हिंस्त्र प्राण्यांच्या सान्निध्यात राहत होता. ऊन, वारा, पाऊस, कडाडणाऱ्या विजा यापासून आश्रय घेण्यासाठी त्याने आधी नैसर्गिकरित्या तयार झालेल्या भिंतींचा म्हणजे डोंगरातील गुहांचा आश्रय घेतला असावा. त्यातूनच संरक्षणासाठी भिंतींची, डोक्यावर छताची कल्पना त्याच्या डोक्यात आली असावी. जसजसा मानव प्रगत होत गेला, तसतशी त्याच्या बांधकामाच्या कलेत प्रगती होत गेली. मग हळूहळू तो दगडांच्या भिंती उभारायला शिकला. आधी झाडांच्या फांद्यांचे, गवताचे छप्पर



तो बांधायला शिकला. आधी झोपडी, मग पक्के घर अशी त्याची प्रगती झाली. विटेचा शोध बऱ्याच उशिराचा असावा. त्यानंतर तो विटांच्या साहाय्याने घरे बांधायला लागला. मग भिंत हे मानवाच्या निवाऱ्याचे, संरक्षणाचे प्रतीक झाले. आता जंगलात उघड्यावर राहणे सोडून माणूस सुरक्षित अशा भिंतींच्या घरात राहायला लागला.

जशी भिंत असलेली घरे मानवाने बांधली, तसेच तो आणखी जसजसा प्रगत होत गेला तसतशी आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी त्याने भिंती असलेल्या शाळांची सुद्धा निर्मिती केली. निसर्गात शिकणारी मुले आता शाळेत शिकू लागली. पण या भिंती असलेल्या शाळेत आयुष्याची सुरुवातीची बरीच वर्षे घालवल्यानंतर सुद्धा तो पूर्ण ज्ञानी कधी होतच नाही. या शाळेच्या बाहेर उघड्या जगात तो बरेच काही शिकतो. अनुभवाची शाळा सगळ्यात मोठी असते. त्यात माणूस जे शिकतो, ते आयुष्यभर लक्षात राहते. म्हणून एखादी यशस्वी व्यक्ती लौकिक अर्थाने फारशी शाळेत गेली नसेल तर तो ' बिनभिंतीच्या शाळेत ' शिकला असे आपण म्हणतो. ही बिनभिंतीची शाळा खूप महत्वाची.

बहिणाबाई या खान्देशातील महान कवयित्री. कधीही शाळेत गेल्या नाहीत. पण बिनभिंतीच्या शाळेत त्यांनी जे ज्ञान ग्रहण केले त्यामुळे त्यांनी चार भिंतीत शिक्षण घेतलेल्यानाही मागे टाकले. प्राथमिक शाळेपासून तो अगदी पी एच डी प्राप्त करणारे विद्यार्थीही त्यांच्या कवितांचा अभ्यास करू लागले.

**अरे संसार संसार**
**जसा तवा चुल्ह्यावर**
**आधी हाताले चटका तेव्हा मिळते भाकर.**

हा धडा बहिणाबाईंना आयुष्याच्या शाळेने शिकवला. काही मिळवायचे असेल, घडवायचे असेल मग ती भाकरीसारखी साधी गोष्ट का असेना, चटका सोसावा लागतो. लता मंगेशकर लौकिक अर्थाने काय दोन चार दिवस शाळेत गेल्या असतील तेवढ्याच. बाकी सगळे त्या आयुष्य, अनुभव नावाच्या बिनभिंतीच्या शाळेत शिकल्या. मात्र नवनवीन गोष्टी त्या शिकतच राहिल्या. अगदी शेवटपर्यंत. त्यातूनच त्या समृद्ध झाल्या. आज बहिणाबाई म्हणा की लता मंगेशकर म्हणा, ज्यांच्याजवळून शिकावं अशी विद्यापीठं झाल्या आहेत. याचा अर्थ असा नाही की ज्या चार भिंतींच्या शाळेत आपण शिकतो, ती उपयोगाची नाही. ती उपयोगाची आहेच, पण बाहेरची बिनभिंतीची शाळा ही त्यापेक्षा खूप मोठी आहे हे सांगण्याचे तात्पर्य !

पूर्वी गावांचे, शहरांचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्याभोवती मोठमोठ्या भिंती बांधल्या जायच्या. चीनची अजस्त्र भिंत ही त्यापैकीच एक असावी. किल्ल्यांभोवतीची तटबंदी ही त्याचेच प्रतीक. भारताच्या उत्तर दिशेला उभा असणारा हिमालय म्हणजे भारताला शत्रूपासून, थंड वाऱ्यांपासून संरक्षण देणारी नैसर्गिक अभेद्य अशी भिंतच ! अशा भिंती संरक्षणाचे, सुरक्षिततेचे प्रतीक असतात. त्या विभाजन करीत नाहीत. माणसाच्या मनातही भेदाभेद करणाऱ्या अदृश्य भिंतींपेक्षा अशा नैसर्गिक संरक्षण करणाऱ्या भिंती उभ्या राहिल्या तर...! फूट पडणाऱ्या भिंतींची जागा अशा भिंतींनी घेतली तर...! सोनेपे सुहागा !

संत ज्ञानेश्वरांच्या काळातील चांगदेव हे चौदाशे वर्षांचे योगी. त्यांनी हे प्रदीर्घ आयुष्य आपल्या तपश्चर्येच्या बळावर प्राप्त केले होते. निसर्गातील वाघ, सिंह आदी हिंस्त्र प्राण्यांवर त्यांची हुकमत चालत होती. पण त्यांना जेव्हा ज्ञानेश्वरांविषयी कळले, तेव्हा कोण हा तरुण पोरगा, जो आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे असे म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरांना पत्र लिहायचे ठरवले. पण मायना काय लिहावा, त्यांना लहान म्हणून आशीर्वाद द्यावा तर ते ज्ञानाने श्रेष्ठ, मोठे म्हणावे तर वयाने लहान. म्हणून कोरेच पत्र पाठवले. लहानगी मुक्ताई म्हणाली, ' चौदाशे वर्षे तपश्चर्या करून चांगदेव कोरेच राहिले. ' अखेरीस चांगदेव त्यांच्या भेटीसाठी निघाले. तेही वाघावर स्वार होऊन, हाती सर्पाचा चाबूक घेऊन. कारण त्यांना ज्ञानेश्वर माउलींना दाखवायचे होते की बघा मीही काही कमी श्रेष्ठ असा योगी नाही. एवढा मोठा योगी आपल्या भेटीसाठी येणार हे जेव्हा ज्ञानेश्वरांना कळले तेव्हा ते आपल्या भावंडांसह एका भिंतीवर बसले होते. ते चांगदेवांच्या स्वागताला निघाले. ते ज्या भिंतीवर बसले होते ती निर्जीव भिंत माउलींच्या आज्ञेने चालू लागली. वाघ, सिंहासारख्या सजीव प्राण्यांवर हुकूमत चालवणारे चांगदेव माउलींनी चालवलेली ती निर्जीव भिंत पाहून खजील झाले. त्यांचा सारा अहंकार एका क्षणात उतरला. ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या ज्ञानाच्या बळावर ती निर्जीव भिंत सजीव केली होती. नेहमी एकाच जागी उभी असणारी, कधीही न हलणारी भिंत आता गतिमानतेचे प्रतीक बनली होती. अशा प्रकारे अज्ञानाच्या भिंतींना आपल्या ज्ञानाने दूर सारता येते, त्या सजीव, उपयोगी आणि ज्ञानी होऊ शकतात हेच माउलींनी आपल्याला दाखवून दिले नाही का ?

या मनामनातल्या भिंती नष्ट होण्यासाठी माउलींच्याच शब्दात मागणे मागू या.

**दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो**
**जो जे वांच्छिल तो ते लाहो, प्राणिजात.**

# समृद्धी निघालीय ब्राझीलला!



देवेंद्र भुजबळ
संपर्क क्र. 9869484800.

आधुनिक केसरी

**आपापल्या देशाच्या समृद्ध परंपरेचा प्रचार व प्रसार करण्याची उत्तम संधी रोटरी क्लबतर्फे रोटरी युथ एक्सचेंज प्रोग्राममार्फत युवकांना मिळत असते. अत्यंत प्रतिष्ठित आणि खूप स्पर्धा असलेल्या या कार्यक्रमात पुणे येथील १६ वर्षीय कु. समृद्धी नितीन विभुते हिची निवड झाली असून ती येत्या बुधवारी ब्राझील साठी रवाना होत आहे. तिच्या या निवडीबद्दल रोटरी क्लब ऑफ पुणे, डेक्कन जिमखाना शाखेतर्फे रोटेरियन प्रेसिडेंट डॉ अमित आंद्रे आणि सेक्रेटरी रोटेरियन डॉ उमेश फालक यांच्या हस्ते तिचानुकताच सत्कार करण्यात आला. या वेळी रोटरी युथ एक्सचेंज इनबाऊण्ड चेअर रोटेरियन सारिका रोडे व सर्व रोटरी मेम्बर उपस्थित होते.**

रोटरी डिस्ट्रिक्ट 3131 च्या आर.वाय.इ डायरेक्टर रोटेरियन शोभा नहार यांच्या मार्गदर्शनाखाली, रोटरी क्लब पुणे डेक्कन जिमखान्याच्या युथ डायरेक्टर रोटेरियन सरिता गोएंका यांच्या प्रेरणेमुळे आणि काऊंसिलर रोटेरियन अनिता कौलगुड यांच्या सहकार्याने कु. समृद्धी ब्रझिलला निघाली आहे. डि.जी ईलेक्ट रोटेरियन मंजू फडके यांचे आशिर्वाद सदैव तिच्या पाठीशी आहेत. समृध्दी ब्राझील मध्ये भारताची आणि रोटरी क्लब, डेक्कन जिमखाना ,पुणे ची प्रतिनिधी म्हणून कार्यरत राहील.

समृध्दी नुकतीच दहावी पास झाली आहे. लहानपणापासूनच ती आवडीने आई वडिल, रोटेरियन नितीन विभुते आणि ज्योती नितीन विभूते -चाळसे यांच्यासोबत गेली १४ वर्षे रोटरी क्लब मध्ये येत असून नाटक,नृत्य आणि इतर विविध उपक्रमात हिरीरीने सहभागी होत आली आहे.



समृध्दीचे वडील रोटेरियन श्री नितीन सखाराम विभुते हे गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर असून सीसीटीव्ही,इलेक्ट्रिकल्स , वॉटर सप्लाय मध्ये डिजाइनिंग, इन्स्टॉलेशन, कमिशनिंग ची कामे करतात. आई रोटेरियन सौ ज्योती विभुते-चाळसे या त्यांना व्यवसायात पूर्ण मदत तर करीतच असतात शिवाय मसाले व बारा महिने चकली उत्पादनाचा व्यवसायही करीत आहेत. त्या उत्तम गृहिणीही आहेत.

विशेष म्हणजे समृद्धी ही त्यांची एकुलती एक मुलगी असूनही तिची निवड झाल्यावर, इतके दूर, तेही एका वर्षासाठी कशाला पाठवायचे असा विचार न करता, तिच्या भविष्याचा विचार करून तिच्या पालकांनी तिला ब्राझील देशामध्ये एक वर्षासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

श्री नितीन यांचे वडील सखाराम विभुते आणि आई सौ रेखा सखाराम विभुते हे दोघेही वारकरी संप्रदायामध्ये असून आजही या संदर्भातील जमेल तेवढे सर्व कार्य भक्तीभावाने करतात. तर भाऊ श्री सचिन विभुते व सौ अरुंधती विभुते व त्यांची दोन मुलं, मुलगा अद्विक व मुलगी दीविना हे अमेरिकेत स्थायिक आहेत.समृध्दीच्या निवडीबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गावाकडचा पाऊस...!



आधुनिक केसरी

आर. आर. पठाण
मो. ९८२२३४८९७०

आजही आठवतो तो गावाकडचा पाऊस...धो धो कोसळणारा अन डाबकी डुबकी, नदी नाल्यातून खळखळ वाहणारा. पहिला पाऊस पडला रे पडला की लोकांची रानातली कामे सुरु व्हायची. नदीला भरगच्च पूर यायचा. आठ आठ दिवसाची झडी असायची. गावात समदिकड़े चिखल व्हायचा. चिखलामुळ गावभर चीक-चीक व्हायची त्यातून पाय भरवत चालायची वेगळीच हौस वाटायची. नदीला भरगच्च पूर आल्यामुळे नदी नाल्यातून मासळ्या गावभर फडफड करत पसरायच्या. गावातील लहान चिल्ली-पाल्ली पोर शाळेला दांडी मारून मासुळ्या पकडायचे. लोकांच्या घरातून भजे- वडे तळण्याचा खमंग सुगंधित वास सुटायचा. म्हातारी माणस चीलमीचा धूर फुकत चुली जवळ बसून गप्पा मारायचे. सार गाव पावसात भिजून ओलचिंब होऊन निघायचं.

काही दिवसानंतर नदी काठी आजूबाजूला हिरव गार गवत मनसोक्त पणे डोलायचं. म्हातारया बायांची जात्यावरची गाणी कानी पडायची. हे सार चित्र जणू आज आठवणीतील भूतकाळाच्या अलमारीत जमा झाल्यासारखं वाटते.

सार गाव बदलत चाललंय. कच्या रस्त्यांएवजी सिमेंटचे रस्ते दिसू लागलेत अन चिखलाचा सुगंधित वासही त्या कच्या रस्त्याबरोबर गावातून कधीचाच निघून गेला.

मातीच्या घरा ऐवजी आता सिमेटची घरे झाली. पण आजही तो वास मनात दरवळत राहतो. नदीतून खळखळ वाहणारा पूरही कुठ दिसत नाही.रानात मनसोक्त चरणारे गुरेढोरेही नजरेत पडत नाहीत. चावडीवर चाललेल्या लोकांच्या गप्पाही कुठे दिसत नाहीत.परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. लोक देखील बदलत आहे.

गाव हे गाव न राहता गावच शहरीकरण होत आहे. गाव आधुनिकतेकडे धावत आहे. पण खेड़ातल्या प्रत्येकाच्या मनात ते गावातील दिवस कायम आहेत. आजही मला पावसात भिजतांना लहान मुले दिसली रे दिसली की, गावाकडच्या पावसात ओलचिंब होऊन भिजल्या सारखा भास होतो व मन हे भूतकाळाच्या आठवणीत रंगून जाते.

# कन्नड तालुक्यात पावसाच्या सलग सरींमुळे जनजीवन विस्कळीत

## दुबार पेरणीचे संकट तर टळले; मात्र रोगांना आमंत्रण, दमदार पावसाची अपेक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**कन्नड :** तालुक्यात शनिवारपासून सलग रिमझिम रिमझिम पाऊसाची सलग सरी असल्या कारणाने शेतकऱ्यांसोबत सामान्य माणसाचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यावर्षी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मान्सून पूर्वच पेरणी अटपूण घेतली होती. मात्र सुरवातीला जोरदार पाउसाचे आगमन झाल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेपोटी पेरणी उरकुन घेतल्या होत्या. सध्याच्या घडिला पेरलेल्या बियांनी आता डोके आकाशाकड़े केले आहेत, एकीकडे शेतकऱ्यांना दमदार पाऊसाची गरज आहे. जोरदार पावसाचे आगमन झाल्यास पिकांवरची रोगराई धुवून निघते मात्र सलग सरी होणाऱ्या पाऊसामुळे पिकावरील रोगांना आमंत्रण मिळण्याचे संकेत दिसत आहे.

तालुक्यात मृग नक्षत्रात 13 जूननंतर काही भागात पेरणीयोग्य पाऊस झाला होता. यंदा कापूस व सोयाबीन पिकांकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. कन्नड तालुक्यात आतापर्यंत 178 मिलिमीटर पाऊस झाला असून सरासरी पर्जन्यमान अपेक्षा जास्त आहे. तालुक्यात खरीपासाठी खूपसाठी कापूस जरी सर्वाधिक सोयाबीन पिकाची लागवड झाली आहे. सर्वदूर पावसाअभावी काही भागात शेतकऱ्यांची खरीप पेढे थांबवली होती. पेरणी झालेली पिकांना लवकर पाऊस न झाल्यामुळे



झाल्यास काही पिकांना व क्षमता सांगणार होती किंवा उपक्रम

### 13 जुलैपर्यंत झालेला पाऊस

| | |
|---|---|
| कन्नड | 264 मिमी |
| चापानेर | 246 मिमी |
| देवगांव रंगारी | 194 मिमी |
| चिखलठाण | 203 मिमी |
| पिशोर | 337 मिमी |
| नाचनवेल | 227 मिमी |
| करंजखेडा | 260 मिमी |
| चिंचोली लिम्बाजी | 319 मिमी |
| आतापर्यंत झालेला पाऊस | 2057 मिमी |
| एवरेज | 257.12 मिमी |

करण्याची भीती होती परंतु दोन दिवसाच्या रिमझिम पावसामुळे तालुक्यात आतापर्यंत 78 मिलिमीटर पाऊस झाला आहे. तालुक्यात जूननंतर पाच ते सहा दिवसात सुमारे 40 मिलिमीटर पाऊस झालेला आहे. तालुक्यात सर्वाधिक पाऊस खालील प्रमाणे झालेल्या आहेत.

**तालुक्यात आपेक्षित व पेरणी झालेली क्षेत्र**

अपेक्षित खरीप लागवड एक लाख एक हजार 445.70 हेक्टर पैकी पेरणी झालेले क्षेत्र 92 हजार 249 हेक्टर म्हणजे 92 टक्के, कापूस अपेक्षित 49 हजार 668 हेक्टर पैकी 43 हजार 820 हेक्टरवरील 88.20 टक्के इतकी पेरणी झाली आहे. मका अपेक्षित 37 हजार 349.60 पैकी 33 हजार 565 हेक्टर वर झालेली आहे म्हणजे 79 85% बाजरी अपेक्षित 3 हज़ार 361 हेक्टर पैकी 1 हजार 221 हेक्टर म्हणजे 45.29 टक्के, सोयाबीन 871.40 हेक्टर पैकी 2 हजार 167 हेक्टर म्हणजे 248.68 टक्के या प्रमाणे पेरणी झाली आहे.

**मागील चार-पांच दिवसापासून सलग सरी चालणाऱ्या पाऊसांमुळे पिकांना तर थोड़े-फार जीवनदान मिळाले मात्र रिमझिम पावसामुळे संपूर्ण गाव चिखलमय झाले आहेत. त्यामुळे नागरिक घराच्या बाहेर निघणेही टाळत आहे. यामुळे व्यवसायावर ही फटका बसत आहे. दुसरीकडे नैसर्गिकरित्या वातावरण बदलत असल्याने लहान मुले जास्त आजारी पडत आहे.**

**शंकर नवले, दुकानदार पिशोर ता.कन्नड**

**या पावसामुळे पिकांवर रोगराईला आमंत्रण**

कन्नड तालुक्यात घडीला सर्वत्र पेरणी पूर्ण झाल्याचे दिसत आहे तसेच अनेकांनी पावसाची वाट न बघता ठिंबक, तुषार, सिंचनाच्या आधारावर पेरणी केले होती तसेच मृग नक्षत्रामध्ये पिकांना हमीचा पाऊस मिळाल्यामुळे आजच्या घडी पिक हिरवे गार दिसत आहे. मात्र पिकावर 100 टक्के रोगाचा प्रादुर्भाव होणार अशी माहिती परिसरातील शेतकरी देत आहे.

# सावळदबारा येथे ग्रामस्थांना शुद्ध पाण्याकरिता विहिरीत ब्लिचिंग पावडरचा वापर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे ग्रामस्थांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी पाणीपुरवठा विहिरीमध्ये ब्लिचिंग पावडर टाकून पाणी शुद्ध व चांगले येण्यासाठी ग्रामपंचायत वचनबद्ध सावळदबारा येथील देव्हारी या गावातून पाणीपुरवठा बऱ्याच वर्षापासून सुरळीत सुरू आहे.

मागील काही दिवसापासून दुष्काळी सदृश्य परिस्थिती असल्यामुळे गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची खूप दुरावस्था झाली कारण विहिरीतच पाणी नव्हते तरीसुद्धा सरपंच स्वाती पाटील व उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य यांच्या प्रयत्नातून आठ दिवस अडका होईना परंतु गावाला टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा सुरळीत चालू होता जून महिना उजळताच पावसाने काही दांडी मारली परंतु नंतर पावसाला सुरुवात झाली परिणामी पाणी पुरवठ्याच्या विहिरीमध्ये पाणी पातळी वाढू लागली व नवीन जुने पाणी एकत्र झाले म्हणून थोड्याफार प्रमाणात पाणीपुरवठा हा दूषित होत असल्याचे प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) व ग्रामपंचायत च्या लक्षात आले त्यामुळे तातडीने पावले उचलून व गावातील काही सुजाण नागरिकांच्या सूचनेप्रमाणे ब्लिचिंग पावडर व स्वच्छता राखून पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्यासाठी तातडीने प्रयत्न झाले.

ग्रामपंचायत अधिकारी सुधाकर भालेराव ग्रामपंचायत कर्मचारी अनिल राजपूत, सुभाष मानकर, संजय नप्ते, अमोल रावळकर यांनी तातडीने केले देव्हारी येथे जाऊन ब्लिचिंग पावडर मिश्रण करून विहिरीत सोडण्यात आले.



त्यांच्या या प्रयत्नाबद्दल सरपंच स्वातीताई कोलते, उपसरपंच मो.आरिफ मो लुखमान ग्रामपंचायत सदस्य पारुबाई मानकर, कविता राजपूत, ज्योतीबाई टिकारे, मिनाक्षी शिप्पलकर, सैनाज तडवी, संदीप सुर्यवंशी उपस्थित होते. गावातील होणाऱ्या सर्व गैरसोयी बद्दल व्यक्त करतो व सर्वाच्या सहकार्याने व आशिर्वादाने यापुढेही गावातील स्वच्छता व गावातील पाणीपुरवठा गावातील विद्दुत पुरवठा व इतर आरोग्य विषयक गोष्टी पूर्ववत करण्याचा आम्ही तुमच्या आशिर्वादाने पूर्ण करु असे प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) याप्रसंगी बोलताना माहिती दिली.



# नावडी येथील मृतांच्या कुटुंबीयांना वैजापूरचे आ.रमेश बोरणारे यांची प्रत्येकी ५० हजाराची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील नावडी गावातील विजेची तार ओढतांनी चार मजुरांचा मृत्यु झाल्याने वैजापुरचे आमदार प्रा. रमेश बोरनारे यांनी मृत कुटुबींयांची भेट घेऊन प्रत्येक कूटुंबास रोख स्वरुपात 50 हजार रुपये मदत करत सांत्वन केले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनद्वारे चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी सरकारच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येक कूटुंबास 5 लाख रुपये मदत जाहीर केली. मात्र कन्नडचे आमदार उदयसिंग राजपुत नावडी येथे सांत्वन करण्यासाठी गेले असता ग्रामस्थांनी मृत कुटुबिंयासाठी मदत करावी अशी आशा बाळगली मात्र राज़पुत ग्रामस्थांना म्हणाले, मला जी मदत करता येईल ती मी करेल पण वैजापुरचे आमदार कन्नडला येऊन मदत करता मग यांनी ही करायला हवी अशी दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. याप्रसंगी रणजीत पा. चव्हाण, संजय पा. बोरनारे, सुनिल सोनवणे, सरपंच विलास जाधव, उपसरपंच निवृत्तीनाथ मुरकुंडे, प्रकाश मगर, सचिन थोरात, भाऊसाहेब थोरात, शैलेंद्र गांगुर्डे, चंदू अण्णा देशमुख, गणेश मुरकुंडे, सुरेश मगर, रामेश्वर आढाव, कल्याण भिडे, निलेश चव्हाण, नवनाथ राठोड व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सुजाता रणसिंग ठरल्या 'मिसेस एशिया - अर्थ 2022' च्या विजेता

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** योगेश मिश्रा आणि निमिषा मिश्रा यांच्या वतीने आयोजित 'मिसेस एशिया अर्थ २०२२ या सौदर्य स्पर्धेत पुण्याच्या खराडी येथील सुजाता दत्तात्रय रणसिंग या विजेत्या ठरल्या आहेत. नुकतीच या स्पर्धेची अंतीम फेरी जयपूर येथील 'दी पुष्कर रिसॉर्ट' येथे नुकतीच पार पडली. अंतिम फेरीत एकूण १० स्पर्धक होते. अंतिम फेरीसाठी निवडलेल्या टॉप फायनलिस्ट मॉडेल्सने टायटल क्रावऊनसाठी कॅट वॉक केला.

या स्पर्धेविषयी बोलताना सुजाता रणसिंग म्हणाल्या, आतापर्यंत मी तीन टायटल जिंकले आहे. 'या तीनही स्पर्धांमधील माझा प्रवास हा खूप सुंदर होता. माझं खूप चांगल ग्रूमिंग झालं. अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. नवीन लोकं भेटली. वैचारीक आदानप्रदान झाली. एक वेगळाच आत्मविश्वास या प्रवासात मला मिळाला. आमची ट्रस्ट आहे, त्यामार्फत आम्ही 'NEW WISDOM INTERNATIONAL SCHOOL' नावाने शाळा चालवतो त्यामध्ये गोरगरीब मुलांना शिक्षण दिले जाते, याशिवाय अनेक सामाजिक आणि शैक्षणिक कार्य करीत असतो. केवळ आवड म्हणून मी या स्पर्धेमध्ये भाग घेतला. मागील वर्षी मिसेस महाराष्ट्रमध्ये मी भाग घेतला होता. त्यात



मला 'मिसेस अचीव्हर्स अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर मी 'वीआ मिसेस इंडिया २०२१' ची विजेता आहे. अन् आता 'मिसेस एशिया - अर्थ २०२२' हे टायटल मला मिळाले आहे. मॉडलिंग किंवा ग्लॅमरस असे माझे कार्यक्षेत्र नाही. पण संधी मिळाली तर मी नक्कीच यामध्ये करीयर करण्याचा विचार करीन. आगामी काळात 'मिसेस वर्ल्ड' स्पर्धेत भाग घेण्याचा मानस आहे. आपल्या ध्येयाकडे सातत्यपूर्ण आत्मविश्वासाने वाटचाल केली तर यश नक्की मिळते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार
● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# विदर्भात सर्वत्र संततधार पाऊस; अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** उपराजधानी नागपूरसह पूर्व विदर्भातील बहुतेक जिल्ह्यात संततधार पाऊस सुरु आहे. नागपुरात अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाला असून नागपूरकरांनी तलावाजवळ गर्दी केली आहे. गोरेवाडा तलावाचे सर्व दरवाजे उघडण्यात आले आहेत. वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या सर्वच जिल्ह्यात पाऊस सुरु असून गडचिरोली जिल्ह्यात अद्याप पूरपरिस्थितीत फारशी सुधारणार नाही. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यासाठी बुधवारी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून सावधगिरी बाळगण्याचे आवाहन स्थानिक प्रशासनांकडून करण्यात आले आहे.

नागपूर जिल्ह्यात सर्वदूर संततधार पावसामुळे नवेगावखैरी, नांद, वेना या धरणांमधून पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे सावनेर, पारशिवनी, रामटेक, उमरेड, भिवापूर या तालुक्यातील अनेक गावांना पुराचा धोका संभवत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच गोसेखुर्द प्रकल्पातील बॅकवॉटरमुळेही काही ठिकाणी पाणी पातळी वाढण्याची शक्यता आहे. या परिसरातील गावकऱ्यांनी सतर्क रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आर. विमला यांनी केले आहे. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून सर्व यंत्रणा सतर्क करण्यात आली असल्याचेही त्यांनी आपल्या संदेशात स्पष्ट केले आहे. या परिस्थितीत नागरिकांनी आवश्यकता नसेल तर घराबाहेर पडू नये व गरजेनुसार सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, पाणी वाहत असताना चुकूनही पुलावरून जाण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे.

आपत्ती व्यवस्थापना संदर्भात कोणतीही माहिती द्यायची असल्यास व मदतीसाठी ०७१२-२५६२६६८ टोल फ्री क्रमांक १०७७ चा वापर करावा, असे आवाहन नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

विदर्भात आणखी दोन दिवस मॉन्सून बरसणार असून, त्यानंतर हळूहळू पावसाचा जोर कमी होणार असल्याचे प्रादेशिक हवामान विभागाचे म्हणणे आहे. बुधवारी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट असून, नागपूरसह अन्य जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. जिल्ह्यात १ जूनपासून आजपर्यंत अतिवृष्टीमुळे नदी, नाल्यांना आलेल्या पुरात वाहून गेल्याने व वीज पडल्याने १४ जणांचा मृत्यू झाला. वर्धा जिल्ह्यात पावसाची संततधार सुरु असून अशातच नदी नाले दुभडी भरून वाहत आहेत. अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. वर्धा तालुक्याच्या पवनूर येथे सतत सुरु असलेल्या पावसामुळे वन विभागाचा वनराई बंधारा फुटला आहे. सोबतच येथील नाल्याला पूर आला आहे. नाल्याला पूर आल्याने पवनूर, खानापूर आणी कामठी या गावात पाणी शिरले असून येथील नागरिकांना स्थलांतरीत करण्यात आलं आहे. पवनूर येथील नागरिकांची तेथीलच असलेल्या मंदिरात व्यवस्था करण्यात आली असून प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

गडचिरोली जिल्ह्यात होत असलेल्या दमदार पावसामुळे नदी, नाल्यांवरील पूल पाण्याखाली आले आहेत. शंभरावर गावांचा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. यासोबतच बीएसएनएलची मोबाइल आणि इंटरनेट सेवाही ठप्प पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. मेडीगट्टा-कालेश्वर धरणाचे ८१ दरवाजे उघडण्यात आल्याने गोदावरी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यासोबतच भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द, चंद्रपूर जिल्ह्यातील इरई, वर्धा जिल्ह्यातील लाल नाला आणि निम्न वर्धा प्रकल्पांचेही दरवाजे उघडण्यात आले आहेत. दक्षिण गडचिरोलीतील एटापल्ली, भामरागड, सिरोंचा तालुक्यात मुसळधार पाऊस होत आहे.

या पावसामुळे एकट्या भामरागड तालुक्यातील ५३ गावांचा तालुका मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. आलापल्ली-भामरागड मार्ग काही वेळ सुरू झाला. नंतर कुडकेली नाल्याच्या पुरामुळे या मार्गावरील वाहतूक पुन्हा ठप्प पडली. सिरोंचा तालुक्यातील झिंगानूर परिसरातील कर्जेल्ली, रामासीगुडम, कोपेला ही गावेही संपर्काबाहेर गेली आहेत. मेडीगट्टा-कालेश्वर प्रकल्पाच्या बॅकवॉटरमुळे अनेक गावांतील शेतीचे नुकसान झाले आहे. वेलगूर येथील माजी मालगुजारी तलावाची पाळ फुटल्याची माहिती आहे.

# वृक्ष लागवडीचे फक्त शिल्लक राहिले खड्डेच

आधुनिक केसरी न्यूज



**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** वनविभागाच्या वतीन मोठा गाजावाजा करीत प्रचंड खर्च करून जिल्ह्यात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. परंतु लागवडीनंतर झाडांची निगा न घेतल्यामुळे सर्व रोपे करपून गेली असून केवळ खड्डेच शिल्लक राहिली आहेत. परिणामी शासनाचे लाखो रुपये पाण्यात गेल्याचे चित्र दिसून येत आहे.

वनविभागामार्फत जिल्हाभरात जुलै २०१८ मध्ये शासनाने मोठा गाजावाजा करून राज्यातील प्रत्येक तालुक्यात वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरवून दिले व त्यानुसार तालुक्यातील प्रत्येक गावात वृक्षारोपण करण्यात आले. मात्र, ही वृक्ष लागवड केवळ फोटोसेशन पुरती मर्यादित राहिल्याने तालुक्यात शतकोटी वृक्ष लागवड योजनेचा बट्ट्याबोळ झाला आहे. पाण्याअभावी बहुतांश झाडे सुकली असून वृक्ष लागवड योजना फसल्याचे दिसून येत आहे. प्रशासकीय पातळीवर वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. जिल्ह्यातील बहुतांश गावांत राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते यांनी सुद्धा वृक्ष लागवड केली. परंतु वृक्षारोपणानंतर या झाडांच्या संगोपनाकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्यामुळे वृक्ष लागवड योजनेतील मोजकेच झाड जिवंत नसल्याचे दिसून येत आहे. वृक्ष लागवड योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने मोठा आटापिटा केला. परंतु प्रशासकीय पातळीवर योजनेला ठेंगा दाखविला जात असल्याने शासनाच्या आदेशाला प्रशासन कसा हरताळ फासत आहे, ही बाब यावरून निदर्शनास येते. पर्यावरणाशी संबंधित संभाव्य धोका टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या वृक्षलागवड योजनेतच जर प्रशासन हलगर्जीपणा करीत असेल तर योजनेचा उद्देश कसा सफल होणार, हा प्रश्नच आहे. शासनाने याकडे गांभीयार्ने लक्ष देणे गरजेचे आहे.

# श्री.सरस्वती भुवन प्रशाला येथे गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृतीत गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे, भारतीय संस्कृतीत अनेक गुरू शिष्यांच्या जोड्या आपल्याला पहायला मिळतात, गुरू शिवाय आयुष्य अपूर्ण आहे असे मानतात.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रशालेचे उपमुख्याध्यापक राजेंद्र कोठावदे, जेष्ठ शिक्षक सुदाम चिंचाणे, प्रफुल्ल कुलकर्णी, श्रीमती शीला पवार व्यासपीठावर उपस्थित होते. प्रसंगी प्रशालेचे संगीत शिक्षक दिनेश संन्यासी यांनी अतिशय सुरेल आवाजात



"गुरूने दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा" हे गीत सादर केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अमृता काळे व प्रा. सुदाम चिंचाणे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्व विशद केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मालती बिरारे यांनी तर आभारप्रदर्शन विलास चव्हाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

**चितेगाव :** आज दि.१३ रोजी पैठण तालुक्यातील चितेगाव येथील रेन्बो पब्लिक स्कूल चितेगाव च्या वतीने गुरुपौर्णिमा निमित्ताने महापुरुषांच्या प्रतिमा पुजन सोबतच पालकांचा व शिक्षकांचा सत्कार विद्यार्थ्यांनी केला. यावेळी गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रृती काळे यांनी केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वाती लघाने यांनी भुषविले तर गुरुपौर्णिमा निमित्ताने २२ विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत पालकांचा व शिक्षकांचा आदर सन्मान व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार साधना कळमकर यांनी केले. यावेळी रेन्बो पब्लिक स्कूल चे मुख्यध्यापक जयराम लघाने व स्वाती लघाने यांची प्रमुख उपस्थिती होती.





**परतूर :** सनशाइन इंग्लिश स्कूलद्वारे आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी वारकऱ्यांच्या पारंपारिक वेशभूषेत या कार्यक्रमात सहभागी झाले होते. टाळ मृदंग आणि हरिनामाच्या गजरात या सोहळ्यास सुरुवात झाली. सनशाइन इंग्लिश स्कूल इथून खंडेश्वर मंदिर ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर असा दिंडी मार्गाने विद्यार्थ्याने हरिनामाचा गजर करत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेश जैवाळ, प्रिन्सिपल सोनाली, शिक्षक गोविंद, महादेव थोरात, सोनाली, आरती यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. या कार्यक्रमाच्या सागते वेळी भाजपा युवा मोर्चाचे सिद्धेश्वर सोळंके, मारुती थोरात, अंगद थोरात, मंगेश वाघमारे यांनी भेट देऊन चिमुकल्याचे स्वागत केले.

# शाळा महाविद्यालयात वैज्ञानिक जाणिवा कार्यक्रमांचे आयोजन करणार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती (शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर स्थापित) जिल्हा कार्यकारिणी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा अध्यक्ष डॉ.रश्मी बोरीकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि त्यांच्याच निवासस्थानी घेण्यात आलेल्या या बैठकीत शाळा महाविद्यालयात आणि समाजस्तरावर वैज्ञानिक जाणीव जागृती व्हावी यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, चमत्कार व त्यामागील विज्ञान यासंबंधी कार्यक्रम आयोजित करणार असल्याचे अनेक पदाधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा महाविद्यालये ऑनलाईन सुरू असल्याने प्रत्यक्ष कार्यक्रम घेणे अवघड झाले होते, ते आता सुरू झाल्याने समितीच्या कार्यास वेग येणार आहे. डॉ.रश्मी बोरीकर यांची संघटनेच्या राज्य स्तरावर निवड झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते हृद्य सत्कार करण्यात आला.

बैठकीस राज्य सरचिटणीस शहाजी भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष भाऊ पठाडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. शिवाजी वाठोरे, डी.एन. जाधव, दीक्षा काळे, ए.एस. टकले, एस.आर. बोरसे, एम.पी. गुंजरगे, ए.जी. जाधव, चंदा वाठोरे, सतीश पवार, अमोल वाकळे आदींसह औरंगाबाद, सिल्लोड, सोयगाव, बिडकीन, हतनूर, लासूर स्टेशन, कन्नड, पाचोड शाखातील कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन भास्कर बनसोडे यांनी तर दीपक खंडागळे यांनी आभार मानले.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष
रविंद्र बनकर
उपाध्यक्ष
अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# डाभा व सावळदबारा परिसरात पिकांना मिळाले जीवदान; पावसाच्या हजेरीने शेतकरी समाधानी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील डाभा व सावळदबारासह परिसरामध्ये गेल्या चार ते पाच दिवसापासुन रिमझीम पाऊस पडत असुन खरिप हंगामातील पिकाना जीवदान मिळाले आहे. डाभा, मोलखेडा, देव्हारी, टिटवी, नादांगाव, नादांतांडा, घाणेगांव तांडा, फर्दापूर आदीसह परिसरातील खरिप हंगामातील पिकाना दिलासा मिळाला आहे.
मृग नक्षत्राची सुरुवात चांगली झाली होती पण काही दिवस पावसाने दडी मारली होती मान्सुनचा दमदार पाऊस कधी येणार याकडे बळीराजासह सर्वाचे लक्ष लागले होते जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासुन काही भागात पेरण्यांना सुरुवात झाली होती. जुन महिना संपला तरी दमदार पावसाचे आगमन झाले नव्हते. त्यामुळे बळीराजा



चिंतेत पडला होता पण जुलै महीना सुरु झाला आणि पावसाने रिमझीम का होईना सुरुवात केली. पेरणी करून निघालेले कोवळे अंकुर या पावसामुळे डोलायला लागले आहेत. त्यामुळे डाभासह परिसरात काय ते ढगाळ वातावरण काय गार हवा. आणि रिमझीम पाऊस हे सध्या तरी कस ओकेमध्ये आहे, असा सुर शेतकरी वर्गातुन निघू लागला आहे.
काही शेतकऱ्यांनी विहीरीतील मुबलक पाण्यावर खरिपाची पिके दिसून येत आहे. पर्वा न करता घाम गाळून पेरणी योग्य वेळी केली होती. मात्र इकडे शेतकऱ्यांच्या शेत जमिनी पावसावरच आवंबून आहे. यंदा शेती कामाची हंगामाच्या पेरणीला प्रारंभ केला होता.

**यंदा दरम्यान दमदार पाऊस पडल्यानंतर पेरण्या करण्याच्या मानसिकतेत डाभात शेतकऱ्यांची लगबध सुरु होती. मृग नक्षत्राची सुरुवात होऊन ही शेतकरी आकाशाकडे डोळे लाऊन बसलेले होते. मान्सुनचा दमदार पाऊस कधी येणार ? याकडे बळीराजासह सर्वाचेच डोळे आकाशाकडे लागले होते. हवामान खात्याच्या व सोयगाव कृषी विभाग यांच्या अंदाजानुसार यंदा मान्सुन चांगला होणार असा अंदाज व्यक्त केला होता. त्यामुळे सध्या तरी काय ढगाळ वातावरण आहे. रिमझिम पाऊस पडतो असे चित्र हे परिसरातून दिसून येत आहे.**

**राहूल हेलोडे**
**सरपंच (शेतकरी) डाभा ता.सोयगाव**



# सैय्यद सुफी बाबा यांचा संदल कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील ऐतिहासिक श्रद्धास्थानातील एक मोठे श्रद्धास्थान म्हणजे सय्यद सुफी गैबान शाह बाबा यांचा इतिहास साडे चारशे ते पाचशे वर्षापूर्वीचा आहे. तिथले सेवेकरी अनिल जाधव यांच्या घराण्यात अनेक वर्षापसून सेवा करत आहे. व दर्गाची संपूर्ण देखभाल वैभव सिरसाठ व इतर त्यांचे शिष्य हे करतात.
दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा बाबांचा उरूस मोठ्या जल्लोष्यात काढण्यात आला. या कार्यक्रमात 300 ते 400 भाविकासाठी जेवणाची सोय असते. कार्यक्रमाचा सम्पूर्ण खर्च कोणाकडेही वर्गणी न मागता स्थानिक भाविक सेवेकरी स्व खर्चातून करतात.
सदर मिरवणुकीत उपस्थित अनिल जाधव, सागर जाधव, वैभव सिरसाठ, सनी सोनवणे, हर्षल खैरनार, लकी पाटिल, अज्जू शेख, यश वानखेडे, बबलू वानखेडे, रितेश इंगळे, अर्जुन पवार, सनी बैसाणे, गणेश बैसाणे, नंदकिशोर बाविस्कर, बेडसे पहिलवान व इतर उपस्थित होते.




# सुखना नदी बचावासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी कवितांचा जागर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सुखना नदी बचाव जन आंदोलन संघर्ष समिती, तिफण त्रैमासिकच्या वतीने या कविसंमेलनाचे गांधी भवनात आयोजन करण्यात आले होते. या अनोख्या कविसंमेलनाचे उद्‌घाटन सकाळचे संपादक दयानंद माने यांच्या हस्ते रोपाला पाणी देऊन झाले.
उदघाटनपर भाषणात माने म्हणाले की, नदी हा माणसांना बांधून ठेवणारा धागा आहे. पाणी आणि पर्यावरण हा जिवनातील महत्वाचा घटक आहे. नदीचे पाणी शरीर आणि मनाचे शुध्दीकरण करते. मात्र अविवेकामुळे नदी, पर्यावरण दुषित करण्याचे काम सुरू आहे.
कविसंमेलनाचे प्रास्ताविक डॉ.शिवाजी हुसे यांनी केले. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवियत्री प्रतिभा अहिरे होत्या. त्यांनी दुषित होत जाणाऱ्या सामाजिक आणि नैसर्गिक पर्यावरणावर कविता सादर केली. या कविसंमेलनात सुनील डोके, हबीब भंडारे, श्रीराम दाबके, रामचंद्र झाडे, संदिप ढाकणे, एम.एम.खुटे, प्रविण दाभाडे, अशोक गायकवाड, लक्ष्मण वाल्डे, अजिंक्य ढाकणे, प्रा.एकनाथ डोळे यांच्या कवितांनी रसिकांच्या मने ढवळून काढले.

# बालगंधर्व स्मृतिदिनी ढोलकीवादक विजय चव्हाण यांचा सोलापुरात होणार गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बालगंधर्व म्हणजे मराठी रंगभूमीला पडलेले संगमरवरी स्वप्न होय. सोलापुरात बालगंधर्वाची गायकी जिवंत ठेवण्यात सिध्दा पाटील नावाच्या बालगंधर्व भक्ताचा खूप मोठा वाटा आहे. दरवर्षी 15 जुलैला बालगंधर्व स्मृतिदिनी संगीत, नाटक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होतो. कै. सिध्दा पाटील स्मृती समितीमार्फत यंदा प्रसिद्ध ढोलकी आणि तालवादक विजय चव्हाण यांचा गौरव करण्यात येत आहे.
महाराष्ट्रातील प्रसिद्ध ढोलकी आणि तालसम्राट विजय चव्हाण आणि निवेदिका व नाट्यकलावंत मंजुषा दिपक गाडगीळ यांचा 15 जुलै रोजी सायंकाळी 6 वाजता कै. निर्मलकुमार फडकुले सभागृह सोलापूर येथे मान्यवरांच्या उपस्थित गौरव होत आहे.
प्रसिद्ध ढोलकी आणि तालसम्राट विजय चव्हाण यांनी भारत



देशासह विविध देशात आपल्या कलेने रसिकांना मोहित केले. त्यांची ढोलकी आणि तालवादयावरील फिरणारी बोटे मोरासारखी थुईथुई नाचणारी वाटतात. त्यांचा कलेने प्रतिभेचे लेणे बहरत गेले आहे.
गौरवाचे कार्यक्रमानंतर विजय चव्हाण यांच्या ढोलकीवादनाचा रंगारंग कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कै. सिध्दा पाटील स्मृती समारोह समितीच्या वतीने सांगण्यात आले. विजय चव्हाण यांचे यानिमित्ताने सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# डॉ. चेतन जाधव पीएच.डी.ने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** डॉ. चेतन कृष्णराव जाधव यांना रसायनशास्त्र या विषयात (ग्रीनर प्रोटोकॉल फॉर द सिंथेसीस ऑफ पोटेन्शली ॲक्टिव हेटरोसाक्लिक कम्पौंड्स) या विषयावर प्रबंध व संशोधन डॉ.सी.एच.गिल यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे यशस्वीरित्या सादर करून विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पी.एचडी.ने सन्मानित केले.
त्यांना विभाग प्रमुख प्रा.डॉ.एम.के.लांडे, कॅप्टन प्रा.एस.टी. गायकवाड, प्रा.अंजली एस.राजभोज, प्रा.सुनील जी शंकरवार,



प्रा बापू शिंगटे, प्रा.भास्कर साठे, प्रा.गिरीबाला बोंडले, प्रा.अनुसया चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.
त्यांच्या यशाबदल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षा श्रीमती ताराबाई जाधव, सचिव सागर जाधव, उदय जाधव, जिजाऊ परिवारातील सर्व शिक्षक, व इतर सहकारी प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी मार्ग दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याबाबत आयुक्तांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दि.३१ जुलै १९३७ रोजी धुळे येथे कोर्टाच्या कामासाठी आले होते ते ज्या रेस्ट हाऊसमध्ये थांबले होते, त्या ट्रॅव्हलर्स बंगलो अर्थात संदेश भूमी समोरील रस्त्यास धुळे महानगरपालिकाच्या महासभेत एकमताने समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी मार्ग असे नामकरण करण्यात आले होते. मात्र सदर मार्गाची वाईट दुरावस्था झाली आहे.
दि.३१ जुलै २०२२ रोजी संदेश भूमी येथे मोठ्या प्रमाणात आंबेडकरी जनता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ट्रॅव्हलर्स बंगलो अर्थात संदेश भूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी येत असते तसेच आमदार, खासदार, मंत्री व विविध पक्ष, संघटना, संस्था तसेच प्रशासनातील बडे अधिकारी येत असतात म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी मार्ग दुरुस्ती व सुशोभीकरण तात्काळ करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन पँथर द पॉवर युथ मूव्हमेंट संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब लक्ष्मीकांत बेडसे व महाराष्ट्र अध्यक्ष वर्षाताई कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रदीपभाऊ बागले यांच्या नेतृत्वाखाली अति-आयुक्त नितीन कापडणीस यांना देण्यात आले तसेच ३१ जुलै २०२२ पर्यंत जर काम करण्यात आले नाही तर संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला. निवेदन देतेवेळी संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रदीप बगले, देवेंद्र पाटील, तेजस पवार, सागर अहिरे, धनराज त्रिभुवणे, अनिल त्रिभुवणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# पत्रकारांवर हल्ला करणाऱ्यांवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा

## धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नांदेडच्या किनवटमधील एका भुमाफियाने सुरू केलेल्या बेकायदेशीर बांधकामाचे फोटो काढणारे देशोन्नतीचे पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्या अंगावर हल्लेखोरांनी गाडी घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेत ते गंभीरित्या जखमी झाले आहेत. त्यामुळे या हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी, त्यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल करावे, अशी मागणी आज धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

सदर पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे तर अद्यापही हल्लेखोर मोकाट असल्याने अनेक पत्रकार संघांनी या घटनेचा निषेधही व्यक्त करीत आहेत. दिवसेंदिवस पत्रकारांवर जीव घेणे हल्ले होत आहेत मात्र हल्लेखोरांवर पत्रकार संरक्षण कायद्यान्वये कारवाई केली जात नाही. अनेक वेळा पत्रकारांकडून या कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी केली जाते मात्र पोलिसांना पत्रकार संरक्षण देणारा कायदा आहे हे माहित आहे किंवा नाही असा संशय ही व्यक्त होत आहे. कारण 2019 मध्ये कायदा अस्तित्वात आहे आतापर्यंत राज्यात या कलमाखाली केवळ 38 गुन्हेच दाखल होऊ शकले आहेत. ही सरकारची आकडेवारी आहे. त्यामुळे हल्लेखोरांवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल होत नसल्याने हल्लेखोर मोकाट फिरतात. अशीच घटना नांदेड येथील किनवट मधील म्हणावी लागेल, पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्यावर हल्ला होऊनही हल्लेखोरांवर पत्रकार संरक्षण कायद्यांवर गुन्हा दाखल न झाल्याने पत्रकार बांधवांनी नाराजी व्यक्त केली आहे. या घटनेचा निषेध करत या हल्लेखोरांवर तात्काळ पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल करावे म्हणून आज धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक प्रवीण कुमार पाटील यांना निवेदन देण्यात आले आहे.

सदर निवेदन देतेवेळी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विशाल ठाकूर, उपाध्यक्ष मनोज गर्दे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कोअर कमिटीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत द्यावी

## जनशक्ती संघटनेचे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना काही अटीमुळे ५० हजार पर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान मिळत नाही याची दखल घेऊन अशा पुर आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना या योजनेतून वगळले जाणार नाही या बाबत शासन निर्णय त्वरित काढण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी चांगली गोष्ट आहे मात्र सोलापूर जिल्ह्यात गेल्या ८ दिवसापासून रिमझिम पाऊस सुरु आहे. या पावसामुळे द्राक्ष बाग व शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून सोलापूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपयांची मदत मिळावी अशी मागणी जनशक्ती संघटनेचे प्रमुख अतुल खूपसे-पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, राज्य सरकार अतिवृष्टी व पूर येईल त्याच ठिकाणी मदत देण्यास कटिबद्ध असते. मात्र सोलापूर जिल्ह्यात अपवाद वगळता कोणत्याच भागात अतिवृष्टी होत नाही आणि नदीकाठ वगळता पुर येत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी नेहमीच राज्य शासनाच्या मदतीपासून वंचित राहिला आहे. परंतु सोलापूर



जिल्ह्यात गेल्या आठ दिवसापासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदारांचे मोठे हाल उठले आहेत. या बागांना वेगवेगळ्या प्रादुर्भावाचा धोका वाढला आहे. त्यामुळे भविष्यात या द्राक्ष बागांना फळ येणे कठीण झाले आहेत. शिवाय अनेक ठिकाणीची शेती दलदलीची बनली आहे. त्यामुळे पीक घेणे कठीण झाले आहे. म्हणून राज्य शासन व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा तळमळीने विचार करणे आवश्यक आहे. राज्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देखील मदत मिळणे अत्यावश्यक झाले आहे. त्यासाठी कोणताही नियम आणि अटी न लावता सरसकट 50 हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी अतुल खूपसे पाटील यांनी केली आहे.

यावेळी उमाकांत तिडके-पाटील, विनिता बर्फे, शर्मिला नलवडे, नानासाहेब लकारे, मराठवाडा अध्यक्ष प्रभाकर लखपत्रिवर, बाबाराजे कोळेकर, अरुण भोसले, अविनाश कोडलिंगे-पाटील, राणा वाघमारे, रामराजे डोलारे, पांडूरंग भोसले, रोहन नाईकनवरे, कल्याण गवळी, अक्षय देवडकर, हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते.

# पोलीस असल्याचे सांगत लूटमार करणाऱ्या टोळीला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**शिरपूर :** तालुक्यातील साखी पाडा (उमरदा) गावी असलेल्या किराणा दुकानात स्कार्पिओ गाडीने आलेल्या आरोपींनी स्वतःला सीबीआय पोलीस म्हणून बोगस बियाणे व खत विक्री संदर्भात घराची झाडाझडती घेतली मात्र घरात काही न मिळून आल्याने या आरोपींनी घर मालकास स्कार्पिओ गाडीत बसवून पैशांची मागणी केली असता फिर्यादी यांच्या पत्नीने ६० भार वजनाचे चांदीचे वेल्या त्यांना आणून दिल्या व आपल्या पतीला ताब्यात पाहून पत्नीने आरडाओरडा केली असता या आरोपींनी तिथून पळ काढला. सदर घटनेची माहिती मिळताच शिरपूर तालुका पोलीस प्रशासनाने ठिकठिकाणी नाकाबंदी केली व या नाकाबंदीत गुन्ह्यांची कबुली दिल्यानंतर धुळ्यातील पाच संशयित आरोपीना बेड्या ठोकल्या तर पळून जाणाऱ्या स्कार्पिओ ड्रायव्हरसह एकाचा शोध पोलीस प्रशासन घेत आहे.

शिरपूर तालुक्यातील साकीपाडा उमरदा येथील किराणा दुकानदार दादल्या गुजऱ्या पावरा यांच्या घरी काल रात्रीच्या सुमारास स्कार्पिओ गाडीने 7 इसम आले असता त्यांनी स्वतःला सीबीआय पोलीस म्हणून सांगत तुम्ही बोगस बियाणे व खते विक्री करतात अशी तक्रार प्राप्त सांगत घराची झाडाझडती घेतली मात्र घरात काही न मिळून आल्याने या आरोपींनी दादल्या पावरा यांना दमदाटी करत त्यांना आपल्या स्कार्पिओ गाडीत बसविले व पैशांची मागणी केली असता भीतीने सैरावैरा झालेल्या त्यांच्या पत्नीने त्यांच्या जवळील 60 भार वजनाचे चांदीचे वेल्या त्यांना आणून दिल्या मात्र तरीदेखील या आरोपींनी फिर्यादीला सोडले नसल्याने पतीने आरडाओरडा सुरू केली. त्या ठिकाणी स्थानिक नागरिक जमा होत असताना तेथील ड्रायव्हर याने तिथून पळ काढला. या आरोपींना विचारपूस केली असता त्यांनी स्वतःला सीबीआय पोलीस म्हणून प्रहार नावाचे कार्ड दाखवले. नागरिकांना संशय येत असल्याने तेथील आरोपीनी पळ काढला. लागलीच या घटनेची माहिती शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ यांना दिल्याने त्यांनी या घटनेची चौकशी करत आरोपींचे वर्णन घेऊन ठिकठिकाणी नाकाबंदी केली.

नाकाबंदीत पाच आरोपींना पकडण्यात यश आले. त्यांची विचारपूस करता ते धुळ्यातील असल्याचे निष्पन्न झाले. यात विजय रमेश देवरे, साहिल कबीर शेख, राहुल दयाभाई पटेल, गोटीराम गिना पावरा, मिलिंद बन्सीलाल शेजवळ अशांना शिरपूर तालुका पोलीस प्रशासनाने बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याविरुद्ध शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले असून घटनेतील पसार झालेल्या नितीन पुंडलिक मुकुंदे व ड्रायव्हरचा ही शोध पोलीस प्रशासन घेत आहे.



वीज दरवाढीच्या विरोधात नागपूरच्या संविधान चौकात भर पावसात आम आदमी पार्टीचे आंदोलन करण्यात आले. यावेळी तरुणाईची मोठी गर्दी होती.



# सौ.सावित्रीताई रंधे कन्या माध्यमिक विद्यालय व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षदिंडी उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**शिरपूर :** येथील सौ.सावित्रीताई रंधे कन्या माध्यमिक विद्यालय व क.स. बर्वे कनिष्ठ महाविद्यालय तसेच सामाजिक वनीकरण विभाग शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक वनीकरण विभागाचे वनक्षेत्रपाल के.व्ही.सैंदाणे होते. वृक्षदिंडी चे पूजण विद्यालयाच्या प्राचार्या सौ.सारीकाताई रंधे व के.व्ही. सैंदाणे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक एन.पी. कापडे, पर्यवेक्षक एस.व्ही. सोनवणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे.जी. चव्हाण तर आभार एम टी. चित्ते यांनी केले. सदर दिंडीत विविध पर्यावरण जनजागृतीपर पोस्टर तसेच वृक्ष हातात घेऊन व घोषणा देऊन पर्यावरण रक्षण करण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

वृक्षदिंडीचा समारोप महात्मा ज्योतिबा फुले (मल्टि टेक) माध्यमिक विद्यालय येथे करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रल्हाद डी. सोनार, उपमुख्याध्यापक सुदाम पाटील, पर्यवेक्षक सुरेश आडगाये व विद्यालयातील सर्व कर्मचारी, विद्यार्थ्यांनी सदर दिंडीचे उत्साहात स्वागत केले. समारोप प्रसंगी प्राचार्या सारीका रंधे यांनी आपले पर्यावरण संरक्षणविषयी आपले मत व्यक्त केले. तसेच के.व्ही सैंदाणे यांनी आपल्या शालेय जीवनापासूनच वसुंधराविषयी आवड निर्माण करून निसर्गावर प्रेम करावे असे आव्हान केले. कार्यक्रमासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल एस.टी. माळी, व्ही.एच. शिसोदे, खान्देश पर्यावरण संरक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हेमंत शेटे, वनरक्षक ए.ए. पगार, वनमजुर विजय मरसाळे, कैलास पावरा आदी उपस्थित होते. समारोपप्रसंगी उपशिक्षक जे.पी. गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. सामाजिक वनीकरण विभागातर्फे वनरक्षक एन.डी. थोरात यांनी दोन्ही विद्यालयातील व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व कर्मचारी वृंद व विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे आभार मानले.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910